# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

**सभा क्रमांक - ०७ मंगळवार दिनांक ३०/०३/२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता महानगरपालिकेच्या राजमाता जिजाऊ सभागृहात (ऑनलाईन ॲप व्दारे) होणा-या अंदाजपत्रकीय सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका.**

| विषय क्र. | विषय |
|---|---|
| २८ | अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०२०-२०२१ चे सुधारित व सन २०२१ - २०२२ चे मुळ अंदाजपत्रक (मनपा शिक्षण विभाग शेअर्ससह) |
| २९ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज. |

मा.महापौर यांचे मान्यतेने.
दिनांक : २४/०३/२०२१.
अहमदनगर.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय जा.क्र. : अम/सका- ०७** **दिनांक : २४-०३-२०२१.**

**अहमदनगर महानगरपालिकेच्या अंदाजपत्रकीय सर्वसाधारण सभेची सुचना** (ऑनलाईन ॲपव्दारे).

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (अ) अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०७, मंगळवार दिनांक ३०/०३/२०२१.**

प्रति,
सन्मा.श्री. / श्रीमती......................................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

यांस-

महोदय,

याद्वारे कळविण्यांत येते की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण २ नियम क्र.१ (अ) अन्वये मा.महापौर यांनी अहमदनगर महानगरपालिकेची अंदाजपत्रकीय सर्वसाधारण सभा **मंगळवार दिनांक ३०/०३/२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील महानगरपालिकेच्या राजमाता जिजाऊ सभागृहात** ऑनलाईन ॲप व्दारे सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

तरी आपणांस सदर सभेस ॲप व्दारे ऑनलाईन सहभागी होण्याची विनंती करण्यांत येत आहे.

सोबत : १. विषय पत्रिका
२. प्रस्तावाची टिप्पणी.

नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**टिप :-** १) प्रत्येक सदस्याने आपल्या Android / Smartphone मध्ये Playstore वरुन AMC Corporator official What's App मध्ये निर्देश दिल्यानुसार ॲप डाउन लोड करुन घेणे.
२) वरिलप्रमाणे ॲप व्दारे प्रत्येक सदस्यांना मा.महासभेस उपस्थित राहता येईल.
३) मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक ०३ जुलै २०२० रोजीचे पत्रान्वये व दिनांक ०९ सप्टेंबर २०२० च्या पत्रान्वये कळविले नुसार सदरची सभा ऑनलाईन ॲप व्दारे आयोजित केली असून, सदर ऑनलाईन सभेच्या प्रक्रिये संदर्भात अधिक माहितीसाठी सन्मा. सदस्यांनी महानगरपालिका सिस्टीम मॅनेजर श्री.अंबादास साळी मो.नं.९५६१००४६४४ यांचेशी संपर्क साधावा ही विनंती.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

महानगरपालिका सचिव कार्यालय जा.क्र.अम / सका - ०७ / २०२१. दिनांक : २४-०३-२०२१.

प्रति,
सन्मा.श्री. / श्रीमती......................................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका,
अहमदनगर.

यांस-

महोदय,

याद्वारे कळविण्यांत येते की, अहमदनगर महानगरपालिकेची अंदाजपत्रकीय सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक २५-०६-२०१९ रोजी दुपारी १.०० वाजता आयोजित केली होती. या सभेत अंदाजपत्रक सादर केल्यानंतर त्यावर अभ्यासासाठी सदस्यांना अवधी मिळावा या मागणीनुसार सदरची सभा मा.महापौर यांनी तहकुब करुन, **तहकुब सभा बुधवार दिनांक २६/०६/२०१९ रोजी दुपारी १.०० वाजता नविन प्रशासकीय इमारत, औरंगाबाद रोड येथील महानगरपालिका सभागृहात** पुढे सुरु होईल असे आदेशीत केले आहे.

आपणांस सभेस उपस्थित राहण्याची विनंती करण्यांत येत आहे.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय सका- ०७ प्रस्ताव क्रमांक : २८ दिनांक:- ३०/०३/२०२१**

---

**प्रस्तावाचा विषय :-** अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०२०-२०२१ चे सुधारित व सन २०२१ -२०२२ चे मुळ अंदाजपत्रक (मनपा शिक्षण विभाग शेअर्ससह)

**--*--**

**प्रस्तावाचा मजकुर :-**

विनंती टिप्पणी देण्यात येते की, सन २०२०-२०२१ चे सुधारीत व सन २०२१-२०२२ चे मुळ अंदाजपत्रक महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम मधील प्रकरण २ महानगरपालिका, नगरपालिका, स्थायी समिती, परिवहन समिती इत्यादींचे कामकाज यामधील मा.स्थायी समितीचे कामकाज (३)(के) अन्वये मान्यता झाल्याचे कायद्यान्वये अधोरेखीत झाले आहे. त्यामुळे सन २०२०-२०२१ चे सुधारीत व सन २०२१-२०२२ चे मुळ अंदाजपत्रक (मनपा शिक्षण विभाग शेअर्ससह) चा विषय मा.महानगरपालिका सभेपुढे ठेवण्यांत यावा हि विनंती.

**--*--**

**दिनांक १८/०३/२०२१ रोजी झालेल्या मा.स्थायी समितीच्या विषय क्रमांक ९२ चा ठराव :-**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०२०-२०२१ चे सुधारित व सन २०२१-२०२२ चे मुळ अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर अधिनियमातील कलम ९६ च्या तरतुदीनुसार अंदाजपत्रक मा.स्थायी समिती सभे समोर पाहिले.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०२०-२०२१ चे सुधारित व सन २०२१-२०२२ चे मुळ अंदाजपत्रकावर सविस्तर सखोल चर्चा करणेत येवुन ही सभा मा.सदस्य यांनी केलेल्या सुचना तसेच दुरूस्ती व फेरफारसह शिफारस करीत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेचे सन २०२०-२०२१ चे सुधारित व सन २०२१-२०२२ चे सालचे अंदाजपत्रकावर सभेमध्ये झालेल्या सविस्तर चर्चेप्रमाणे (**सोबत जोडलेल्या तक्त्यामध्ये** ) दर्शविल्यानुसार अंदाजीत जमा खर्चाच्या रकमा फेरफार करणेस तसेच नागरिकांना महत्वपूर्ण नागरी सुविधा देण्यासाठी आवश्यक ती तरतुद करणेस ही सभा सर्वानुमते मंजूरी देणे बाबत शिफारस करीत आहे.

**तसेच**

* सर्वसाधारण कर वसुलीमध्ये सक्षम अधिका-यांच्या नेतृत्वाखाली संपुर्ण मालमत्तांचे रिव्हीजन च्या माध्यमातून उत्पन्नाचे स्त्रोत वाढणार असल्याने सर्वसाधारण करामध्ये १५ टक्के वाढ सुचविणेस ही सभा मान्यता देत आहे.
* बिगरशेती करतांना महानगरपालिका हद्दी मध्ये बिगरशेती जामीनीवर टॅक्स लावणे अपेक्षित आहे. मालमत्ता सध्या शेती असून बिगरशेतीचे प्रस्ताव सादर करतांना त्यांचेकडून कोणतेही शुल्क आकारले जात नाही असे निदर्शनास येत आहे. या करीता लेखाशिर्ष मध्ये रू. ६० लाख तरतुद करण्यात यावी.
* शहरातील इमारतींच्या संख्येमध्ये मोठया प्रमाणात वाढ होत आहे. त्या दृष्टीने अग्नीशमन विभागाकडील "ना हरकत प्रमाणपत्र " या लेखाशिर्षा मध्ये रू.५ लाखांनी वाढ करण्यात यावी.

* नवीन वैद्यकीय व्यावसायीकांचा शोध घेवून मुंबई नर्सिग होम ॲक्ट फि पासून मिळणा-या उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने कार्यवाही करावी. या लेखाशिर्षा मध्ये रू.७ लाखाने वाढ सुचविण्यात येत आहे.

* गाळे हस्तातंरणाची प्रक्रिया प्रभावीपणे चालू असल्याने रू. २५ लाखाची वाढ सुचविण्यात येत आहे.

* नोटिस फि / शास्ती या लेखार्शिर्षा अंतर्गत रूपये १ कोटी ७५ लाखाने वाढ करण्यात यावी.

* अग्निशमन विभागाच्या अधिकारी व कर्मचारी त्यांचे कर्तव्य बजावत असतांना अपघात होण्याची शक्यता असत्याने आपण त्यांचा अपघाव विमा उतरविणे आवश्यक आहे.त्याचे बरोबर इतर विभागातील जे कर्मचारी अधिकारी त्यांचा जीव धोक्यात घालून काम करित असतील त्या सर्व अधिकारी व कर्मचा-यांचा अपघात विमा उतरविण्यात यावा.

* अग्निशमन वाहन खरेदी या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रूपये २५ लाखाने वाढ करण्यात यावी.

* अहमदनगर महानगरपालिकेचे कै.बाळासाहेब देशपांडे येथील रक्तपेढी पुर्ववत सुरू करणे करीता आवश्यक असलेला आपल्याकडील डॉक्टर, तांत्रिक कर्मचारी इतर विभागामध्ये नियुक्ती रदद करण्यात येवून आवश्यक ते कर्मचारी मानधनावर नियुकती करून गोरगरीब गरजु जनतेचा विचार करून रक्तपेढी तात्काळ पुर्ववत सुरू करण्यात यावी.

* चितळे रोड येथील नेहरू मार्केटच्या ठिकाणी अदयावत शॉपिंग कॉम्प्लेक्स व भाजी मार्केट करीता वित्तीय संस्था /बॅकेमार्फत कर्ज उपलब्ध करून किंवा एफ.बी.टी /बी.ओ.टी तत्वावर बांधकाम करण्याचा प्रस्ताव तात्काळ सादर करावा.

* प्रोफेसर कॉलनी चौक समोरील जागेत शॉपिंग मॉल उभारणे कामी पुन्हा एकदा प्रयत्न होवून वित्तीय संस्था /बॅकेमार्फत कर्ज उपलब्ध करून किंवा एफ.बी.टी /बी.ओ.टी तत्वावर उभारणी करणे करीता प्रशासनाने तात्काळ प्रस्ताव सादर करावेत.

* सावेडी गांवठाण येथील महानगरपालिकेच्या शॉपींग सेंटर (एन.सी.सी.कार्या .) या ठिकाणी अदयावत शॉपिंग कॉम्प्लेक्स करीता वित्तीय संस्था /बॅकेमार्फत कर्ज उपलब्ध करून किंवा एफ.बी.टी /बी.ओ.टी तत्वावर प्रस्ताव सादर करण्यात यावेत.

* शहराच्या मध्यवस्तीमध्ये अस्तीत्वात असलेले गंजबाजार भाजी मार्केट अत्यंत जुने झाले असून या ठिकाणी भाजी मार्केट व आदयावत सुवर्ण पेढी (सराफ बाजार )उभारणे कामी वित्तीय संस्था /बॅकेमार्फत कर्ज उपलब्ध करून किंवा एफ.बी.टी /बी.ओ.टी तत्वावर प्रशासनाने लवकरात लवकर प्रस्ताव सादर करावेत.

* अनाधिकृत बांधकाम नियमानुकुल करणे या लेखाशिर्षा मध्ये मागील तीन वर्षा मधील उत्पन्न पहाता या रू.१ कोटी ने वाढ सुचविण्यात येत आहे.

* मालमत्ता नांव नोंदणी फि या लेखाशिर्षा मध्ये नविन घरांना घरपटटी लागु करणे बाबत पाठपुरावा करून मालमत्ता धारकांच्या प्रॉपर्टी ज्यांची महानगरपालिकेकडे नोंद नाहीत. अशा प्रॉपर्टीची नव्याने वाढ होवून होणार आसल्याने रू.५० लाखांनी वाढ सुचविण्यात येत आहे.

* "गुंठेवारी विकास नियमिती करणे " यालेखाशिर्षामध्ये रूपये ६ लाख वाढ करण्यात यावी.

* "जाहिरात बोर्ड जागा भाडे " या लेखाशिर्षाअंतर्गत जाहिरात बोर्ड बाबत राज्यसरकारने केलेल्या नियमांची अंमलबजावणी करून आकारणी दराची नियमावली लागु झाल्यानंतर या उत्पन्नमध्ये वाढ होणार असलयाने या लेखाशिर्षामध्ये रक्कम रूपये १२ लाख रूपयांनी वाढ करण्यात यावी.

*       भाडेतत्वावर दिलेल्या शाळाखोल्यामधील थकबाकीदारांवर कडक करावाई करण्यात येवून तसेच बंद असलेल्या शाळा खाजगीकरणाच्या माध्यमातुन चांगल्या शैक्षणीक संस्थांच्या मागणी नुसार भाडेतत्वावर देण्यात याव्यात जेणे करून महानगरपालिकेच्या उत्पन्नामध्ये वाढ होईल "मनपा शाळा भाडेपासून उत्पन्न "या लेखाशिर्षातंर्गत रू.२५ लाखाची वाढ करण्यात यावी.

*       शहरामध्ये ब-याच ठिकाणी अनाधिकृत रित्या पे ॲण्ड पार्क चालू आहे.यांची शोध मोहिम हाती घेण्यात यावी." पे ॲण्ड पार्क "या लेखाशिर्षामध्ये मोठया प्रमाणात उत्पन्न मिळणार असल्याने या लेखाशिर्षा मध्ये १० लाख रूपयांची तरतुद दर्शविण्यात यावी.

*       मोबाईल टॉवर प्रशासकिय शुल्क या लेखाशिर्षामध्ये रू.२५ लाख रूपयांची वाढ सुचविण्यात येत आहे.

*       मोबाईल टॉवर दंडात्मक कारवाई या लेखाशिर्षा अंतर्गत रू.५० लाखाची वाढ करण्यात यावी.

*       रस्ता फोडणे, जोडणे वसुली व बांधकाम इतर या लेखाशिर्षा मध्ये रूपये १ कोटी रूपयांनी वाढ करण्यात यावी.

*       हॉस्पीटल व दवाखाने यांचे कडून जैव वैद्यकीय कचरा संकलन करणे,वाहतुक करणे,प्रक्रीया करणे व विल्हेवाट करणे इत्यादी कामा करीता आकारण्यात येणा-या दरामध्ये सुरूवातीला ३० टक्के दर वाढ व दर २ वर्षानी त्यामध्ये १० टक्के दरवाढ होणार असल्याने या पासुन मिळणा-या उत्पन्नामध्ये जैव वैद्यकीय कचरा विल्हेवाट या लेखाशिर्षा अंतर्गत रूपये ३० लाखांनी वाढ करण्यात यावी.

*       खाजगी तत्वावर कचरा संकलन वाहतुक खाजगी तत्वावर चालू असल्याने ठेकेदारास मागील व चालू वर्षी खरेदी केलेल्या गाडया ठेकेदार संस्थेस भाडेतत्वावर दिल्याने घनकचरा संकलन व वाहतुक अंतर्गत मनपा वाहन भाडेपासून उत्पन्न या लेखाशिर्षा अंतर्गत रू.५० लाखांनी वाढ सुचविण्यात येत आहे.तसेच ठेकेदार संस्थेबरोबर झालेल्या करारानुसार उपलब्ध असलेल्या वाहनांच्या पार्कीग करीता दिलेल्या जागेचे भाडे आकरण्यात यावे.

*       मा.शासनाने पारित केलेल्या जी.आर.नुसार व एफ.एस.आय.देणे करीता अतिरीक्त चटई क्षेत्रे निर्देशांक पोटी प्रिमियम या लेखाशिर्षा मध्ये रू.१ कोटीने वाढ करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

*       स्वच्छ पर्यावरण निर्माण करण्याकरिता ऑक्सीजनची जास्तीत जास्त निर्माण करणा-या करीता नगरशहरातील काही स्वयंसेविसंस्थांचे सहकार्या घेवून वृक्ष लागवड चळवळ उभी करण्यात यावी.या कामी आदरनिय पद्मश्री पोपटराव पवार यांचे मार्गदर्शन घेण्यात यावे.

*       केडगांव सबस्टेशनजवळ महानगरपालिकेच्या मालकीची अंदाजे तीन एकर क्षेत्रफळाची जागा असून या ठिकाणी राज्यस्तरीय स्पर्धाचे आयोजन होवू शकेल अशा स्वरूपाचे क्रीडासंकुल विकसीत करण्याकरीता सार्व.बांधकाम विभागाने प्रस्ताव तयार करून मा.शासनास पाठवून निधी मिळणे बाबत कार्यवाही करावी.

*       " विकास भार निधीतुन खर्च " या लेखाशिर्षाअंतर्गत रू. ५० लाखाने वाढ करण्यात यावी.

*       " बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा " या लेखाशिर्षा मध्ये रू. १० लाख रूपयांनी वाढ करावी.

*       "रेखांकनमधील अंतर्गत सुधारणा (ले आउट धारक ) " या लेखाशिर्षामध्ये रू.२५लाखने वाढ सुचविण्यात येत आहे.

*       सध्याच्या युवा पिढीला महापुरूषांच्या पराक्रमांची व आदर्शाची ओळख व्हावी व महापुरूषांच्या कार्यातुन प्रेरणा घेवून त्यांच्यावर चांगले संस्कार होणे आवश्यक आहे.त्या करीता

१. छत्रपती शिवाजी महाराजांचा पुर्णाकृती पुतळा मनपाच्या आवारामध्ये बसविण्याची कार्यवाही करण्यात यावी.

२. राष्ट्रपुरूष महात्मा ज्योतिबा फुले यांचा पुर्णाकृती पतळा माळीवाडा वेशीमध्ये बसविण्यात यावा.

३. महापुरूष डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा मार्केट यार्ड चौकामध्ये बसविण्यात यावा.

४. छत्रपती संभाजी महाराज यांचा पुर्णाकृती पुतळा सावेडी भागातील प्रोफेसर चौक येथे बसविण्यात यावा. वरिल सर्व पुतळे बसविणे कामी मा.शासनाचे सर्व नियम व अटी यांची परवानगी घेवून येत्या वर्षामध्ये हे सर्व पुतळे बसविण्याचा माझा प्रयत्न राहील या करीता प्रत्येकी रक्कम रूपये १० लाखांची तरतुद करण्यात यावी.त्यासाठी पुतळे बसविणे या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रूपये ४० लाखाने वाढ करण्यात यावी.

* अनाधिकृत नळ कनेक्शन ची शोध मोहीम हाती घेवून उत्पन्नामध्ये वाढ करण्यात यावी. अनाधिकृत नळ निमानुकुल करणे या बाबत योजना जाहिर करण्यात यावी.यास्तव या लेखाशिर्षाअंतर्गत रू.१ कोटीची वाढ करण्यात यावी.

* नळधारकाकडून जमा पाणी पट्टी या लेखाशिर्षा अंतर्गत रककम रूपये २ कोटींने वाढ करण्यात यावी.

* पाणी विक्री जमा या लेखाशिर्षा मध्ये रू.५० लाख ने वाढ करण्यात यावी.

* **ॲम्बुलन्स खरेदी** या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रूपये २० लाखाने वाढ करण्यात यावी.

* सावेडी, बोल्हेगांव ,नागापुर या उपनगरांमधील नागरीकांचे आरोग्य विषयक सूविधा देणे करीता सावेडी येथील प्रभात बेकरी मागील जागेमध्ये ए.आर. च्या माध्यमातुन महानगरपालिकेचे अदयावत हॉस्पीटलची उभारणी करीता प्रशासनाने संबंधितांकडे पाठपुरावा करून गोरगरीब नागरीकांकरीता आरोग्य सेवा लवकर उपलब्ध करून दयावी.

* टि.डी.आर.च्या माध्यमातुन काही मोक्याच्या व विकसीत करता येत्ील अशा जागा महानगरपालिकेला प्राप्त झालेल्या आहेत. अशा जागेचा सर्व्हे करून त्या जागा विकसीत करण्याबाबतचे प्रस्ताव तात्काळ सादर करण्यात यावेत.

* मा.राष्ट्रीय हरित लवादाने दिलेल्या सुचनेच्या अनुषांगाने शहराच्या उर्वरीत सावेडी,बोल्हेगांव,केडगांव,मुकुंद नगर इ.परिसराच्या भुयारी गटर योजने करीता शहर उपनगर भुयारी गटर योजना टप्पा -२ मनपा हिस्सा नविन लेखाशिर्ष नविन लेखाशिर्षा अंतर्गत रू. ५ कोटींची तरतुद करण्यात यावी.

* कोविड -१९ प्रार्दुभाव रोखण्याकरीता आजार प्रतिबंधक उपया म्हणून शहर हद्दीमध्ये औषध फावरणी करण्यात यावी.या कामा करीता कोणताही निधी कमी पडू दिला जाणार नाही याची दक्षता घेण्यात यावी. हिवताप प्रतिबंधक योजना कंत्राटी पध्दतीने फवारणी लेखाशिर्षांतर्गत रू.१५ लाखाने वाढ करण्यात यावी.

* रक्तपेढी औषधे व उपकरणे खरेदी करणे या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रूपये १० लाखाने वाढ करण्यात यावी.

* **जेटिंग मशिन खरेदी** हे नविन लेखाशिर्षा निर्माण करून त्या अंतर्गत रक्कम रूपये ५० लाखाने वाढ करण्यात यावी.

* मा.सदस्य प्रभाग विकास स्वेच्छा निधी या लेखाशिर्षा अंतर्गत झालेल्या कामाचे देयके अर्थ विभागाकडे प्राप्त झाल्या नंतर ती तात्काळ अदा करण्यात यावी.

* जेंडर बजेट महिला व बाल कल्याण कार्यक्रम करीता रूपये ४९लाखांनी वाढ करण्यात यावी.

* समर्थ नगर उंच पाण्याची टाकी करीता १० लाखांनी वाढ करण्यात यावी.

* शहरातील विविध ठिकाणी क्रीडांगणे विकसीत करणे करीता रक्कम रूपये ५ लाखांनी तरतुद वाढविण्यात यावी.

* मा.कै.शंकरराव घुले मा.नगराध्यक्ष यांचे कार्यकाळामध्ये महानगरपालिकेच्या अधिकारी व कर्मचा-यांकरीता टि.व्ही.सेंटर सावेडी या ठिकाणी मनपा कर्मचारी घरकुल योजना राबविण्यात आली होती.या योजनेला सुमारे तीस वर्षापेक्षा जादा कालावधी झाला आहे.या नंतर मनपा कर्मचा-यांकरीता घरकुल योजना राबविण्यात आलेली नाही.या करीता नगररचना विभागाने जागा उपलब्ध करून दयावी व उपलब्ध जागेवर महानगरपालिका कर्मचा-यांकरीता घरकुल राबविण्याचा माझा मानस आहे. "महानगरपालिका कर्मचा-यांकरीता घरकुल योजना" या लेखाशिर्षा मध्ये रक्कम रूपये ५० लाखाची तरतुद करण्यात यावी.

* मा.महापौर शहर विकास निधी रू.२ कोटी, मा.उपमहापौर शहर विकास निधी रू.५०लाख, मा.स्थायी समिती सभापती शहर विकास निधी रू.५० लाख, सभापती ,महिला व बाल विकास निधी रू.१५ लाख, उपसभापती , महिला व बाल कल्याणस निधी रू. १० लाख, मा.विरोधी पक्ष नेता शहर विकास निधी रू.२५ लाख तसेच मा.सभागृह नेते शहर विकास निधी रू.५० लाखाची तरतुद दर्शविण्यात यावी.

* **स्मशान भुमी सुधारणा** या लेखाशिर्षा अंतर्गत रक्कम रूपये २० लाख रूपयांनी वाढ करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

* अहमदनगर महानगरपालिका हद्दीमधील हजी हसन शहा कादरी कब्रस्तान करीता मा.शासनाकडून प्राप्त "अल्पसंख्यांक बहुल क्षेत्र निधी " या लेखाशिर्षा अंतर्गत संरक्षण भिंतीचे बांधणे ,मेन गेट करणे,रस्ता कॉक्रीटीकरण करणे करीता रककम रूपये २० लाखांची कामे या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावीत.

* विकास योजना जी.आय.एस. बेस्ड तयार करणे या नविन लेखाशिर्षा अंतरर्गत रक्कम रूपये ३ कोटी ची तरतुद करण्यात यावी.सदरचा खर्च अमृत योजना , १५ वा वित्त आयोग / विकास भार निधी किंवा वैशिष्टपुर्ण योजने आंतर्गत भागविण्यात यावा.

* रामचंद्र खुंट ते नालबंद खुंट चौका पर्यतचा रस्ता मजबुतीकरणा सह डांबरीकरण/ कॉक्रीटीकरण करणे करीता रक्कम रूपये ३० लाखांची तरतुद करण्यात यावी.सदर कामाकरीता "नविन रस्ते विकसीत करणे "या लेखाशिर्षा अंतर्गत खर्च भागाविण्यात यावा.

* प्रभाग क्रमांक ११ मधिल कानडे मळा येथील चौधरी नगर अंतर्गत रस्ते कॉक्रीटीकरण करणे तसेच कानडे मळा येथील प्रकाश काळे घर ते शिंदे घर ते आगरकर घर ते मेन रोड पर्यत कॉक्रीटीकरणक करणे तसेच तात्या भदर घर ते रासकर घर ते पुंड घर ते मेन रोड पर्यत कॉक्रीटी करण करणे या कामाकरीता रू.२० लाखचा खर्च **"अतिरीक्तचटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे "** या लेखाशिर्षा अंतर्गत भागविण्यांत यावा.

* प्रभाग क्र. ११ मधिल नवजीवन कॉलनी ,पुनममोतीनगर ,अरिहंत कॉलनी रस्त्याच्या साईडला पेव्हिंग ब्लॉक टाकणे तसेच सिताबन कॉलनी ते भिंगार नाल्या पर्यत पेव्हिंग ब्लॉक बसविणे या भागातील लाईट पोल शिप्ट करणे व झाडे लावणे व बाकडे बसविणे करीता रू.३० लाखचा खर्च **"अतिरीक्तचटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे "** या लेखाशिर्षा अंतर्गत भागविण्यंत यावा.

* प्रभाग क्र. १० मधिल कोठला भागातील मोहरम मार्ग कॉक्रीटीकरणे / डांबरीकरण करणे करीता रू.२५लाखचा खर्च **"अतिरीक्तचटई क्षेत्र निर्देशांकपोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे "** या लेखाशिर्षा अंतर्गत भागविण्यंत यावा.

* प्रभाग क्रमांक १४ बुरूडगांव रोड येथील शंभुनगर ते आनंद पार्क पर्यत चा रस्ता मजबुती करणासह डांबरीकरण करणे करीता अंदाजीत रक्कम रूपये २५ लाख **"विकास भार निधी"** या लेखाशिर्षा अंतर्गत जमा होणा-या रकमेतुन भागविण्यात यावा.

*      प्रभाग क्रमांक १० मधील मंगलगेट भागातील महानगरपालिकेच्या मालकीचा कत्तल खाना दुरूस्त करण्यात यावा.सदरचा खर्च **इमारत दुरूस्ती या लेखाशिर्षा** अंतर्गत करण्यात यावा. या कामा करीता रक्कम रूपये २५ लाखांची तरतुद मध्ये वाढ करण्यात यावी.

*      प्रभाग क्रमांक ७ मधील चंदु आरडे घर ते जिल्हा परिषद मराठी शाळे ते बिरोबा मंदिर ते सिना नदी पर्यत ड्रेनज लाईन टाकाणे करीता रक्कम रूपये ३० लाख सदरचा खर्च **"विकास भार निधी"** अंतर्गत भागविण्यात यावा.

*      प्रभाग क्र.८ मध्ये आनंद पार्क येथील मेन ड्रेनेज लाईन बबनराव लठाड घर ते अनुसया नगर ते लखापती यांच्या घरापर्यत तसेच शिंदे फिटनेस ते मळगंगा देवी मंदिर ते घोडके किराणा स्टोअर्स पर्यत तसेच दिनकर आधाव ते सिंहगड फेज १ ते मेवाडा नगर पर्यत ड्रेनेज लाईन करणे अंदाजीत खर्च रक्कम रूपये ३० लाख तरतुद करण्यात यावी.सदर खर्च **नविन ड्रेनेज** या लेखाशिर्षअंतर्गत करण्यात यावा.

*      आदर्श नगर येथील गणपती मंदिर ते अडसुळ किराणा ते डिपी रोड ते वाव्हळ सर घरापर्यत चा रस्ता कॉक्रीटीकरण करणे सदर कामाचा अंदाजीत खर्च रक्कम रूपये ३० खर्च **नविन रस्ते विकसीत करणे** या लेखाशिर्षाअंतर्गत करण्यात यावा.

*      "उल्लेखनिय कार्याबद्दल गौरव"या लेखाशिर्षामध्ये रूपये १ लाख रूपयांनी वाढ करण्यात यावी. व या अंतर्गत दिव्यांग चि.अक्षय सुनिल वैद्य याचा राष्ट्रपती मा.प्रणव मुखर्जी यांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला. दिव्यांग चि.अक्षय सुनिल वैद्य याचा महानगरपालिकेमार्फत सत्कार करून त्यास उत्तेजनार्थ रक्कम रूपये ५० हजार देवून गौरव करण्यात यावा. **"उल्लेखनिय कार्याबद्दल गौरव"** या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावा.

*      **सामाजिक संस्थांना देणगी** या लेखाशिर्षामध्ये रूपये ४.५० लाख तरतूद दर्शविण्यात यावी. रसिक ग्रुप,अ.नगर व नगर जल्लेष (ट्रस्ट) अ,नगर , अंत्यसंस्कार सहाय्यक मंडळ ,अमरधाम या सामाजिक संस्थांना मागणी पत्रानुसार अनुक्रमे रूपये १लाख ५० हजार देणगी देण्यास मान्यता देण्यात येत आहे. याबाबत संबंधीत संस्थाकडून कागदपत्राची पुर्तता करून प्रशासकीय मान्यता घेण्यात यावी. सदरचा खर्च **सामाजिक संस्थांना देणगी** या लेखाशिर्षातंर्गत करण्यात यावा.

*      महानगरपालिकेची जेथे हद्द सुरू होते. त्या ठिकाणापासून पुढे दोन किलोमिटर पर्यत सध्याच्या रोडला सर्व्हीस रोड (WBM) करण्याकरीता.सदर कामास लागणारा निधी करीता सार्व. बांधकाम विभागाने मा.शासन स्तरावर प्रस्ताव पाठवून निधी उपलब्ध करून घ्यावा.

*      प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत पात्र लाभार्थीचे कर्ज मंजूर करून घेणे,योजनेची जाहिरात करणे,या कामी पी.एम.सी.ची नेमणूक करणे करीता प्रकल्प विभागाने तात्काळ प्रस्ताव सादर करावा. या कामा करीता येणारा खर्च **सर्वासाठी घरे मनपा हिस्सा** या लेखाशिर्षा अंतर्गत भागविण्यात यावा.रक्कम रूपये ५० लक्ष ने वाढ करण्यात यावी.

*      शहरातील प्रमुख चौक सुशोभिकरण करण्याच्या दृष्टिने खाजगी संस्था,सामाजिक संस्था,यांचे मार्फत कार्यवाही करण्यात यावी तसेच शहरातील प्रमुख रस्त्यावरील डिव्हायडर सुशोभिकरण करणे देखील आवश्यक असून त्यामुळे परिसर देखील सुशोभित होईल या करिता डिव्हायडर सुशोभिकरण खाजगी संस्था,कंपनी,सामाजिक संस्था यांना या कामी प्रवृत्त करण्यात यावे व त्यांचे मार्फत सुशोभिकरणास परवानगी देण्यात यावी.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९५ नुसार सन २०२१-२०२२ चे सुधारित अंदाजपत्रकातील तरतुदींची त्वरीत अंमलबजावणी करण्यात यावी.

सन २०२१-२०२२ अंदाजपत्रकाच्या प्रती छापून घेवुन अहमदनगर महानगरपालिका सदस्यांना देण्यांत याव्यात खर्च मंजूर.

वरीलप्रमाणे सुचविलेल्या दुरूस्त्या शिफारसीसह सन २०२०-२०२१ चे सुधारित व सन २०२१-२०२२ सालचे बाबवार अंदाजपत्रकास मान्यता व शिफारशी सह मा.महानगरपालिका सभे पुढे सादर.

ही अर्थसंकल्पावर शिफारशी करण्याकरीताची सभा असल्याने या सभेचे इतिवृत्त कायम होण्याची वाट न पाहता या सभेतील ठरावानुसार कार्यवाही करण्यात यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.प्रकाश भागानगरे सही /-

अनुमोदक :- मा.श्री.डॉ.सागर बोरूडे सही /-

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही /-
( मा.श्री. अविनाश हरिभाउ घुले )
सभापती,स्थायी समिती,
अहमदनगर महानगरपालिका.

**सोबत** :- सन २०२१-२२ सालचे मुळ अंदाजपत्रकामध्ये केलेल्या बदलांचा तक्ता

अहमदनगर महानागरपालिका अहमदनगर

मा. स्थायी समितीने शिफारस केलेला सन २०२१-२०२२ चा अर्थसंकल्प (आकडे लाखात)

सुरवातीची शिल्लक (दि.१/०४/२०२१)........................................... ४५८.९६
एकुण जमा.................................................................... ७०४०३.२८
सुरवातीचे शिलकेसह एकुण जमा................................................ ७०८६२.२४
एकुण खर्च.................................................................... ७०५४०.२४
अखेरची अंदाजे शिल्लक (दि. ३१/३/२०२२)....................................... ३२२.००

| अ. नं. | **लेखाशिर्ष (जमा बाजू) सन २०२१-२२** | मा.आयुक्त यांनी केलेली तरतूद | मा. स्थायी समितीने केलेला बदल | | मा. स्थायी समिती सभेने मंजुर केलेली तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ |
| १ | सर्वसाधारण कर | ४०५०.०० | ६०७.५० | | ४६५७.५० |

| अ. नं. | लेखाशिर्ष (जमा बाजू) सन २०२१-२२ | मा.आयुक्त यांनी केलेली तरतूद | मा. स्थायी समितीने केलेला बदल | | मा. स्थायी समिती सभेने मंजुर केलेली तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| २ | बिगरशेती जमिनीवर कर | ०.०० | ६०.०० | | ६०.०० |
| ३ | ना हरकत प्रमाणपत्र (अग्निशमना) | ३.०० | ५.०० | | ८.०० |
| ४ | मुंबई नर्सिंग होम ॲक्ट फी | १.०० | ७.०० | | ८.०० |
| ५ | गाळे हस्तांतरण फी | ७५.०० | २५.०० | | १००.०० |
| ६ | नोटीस फी/शास्ती | ४०००.०० | १७५.०० | | ४१७५.०० |
| ७ | अनधिकृत बांधकाम नियमाुकूल करणे | १२५.०० | १००.०० | | २२५.०० |
| ८ | मालमत्ता नावनोंदणी फी | ४२३.५० | ५०.०० | | ४७३.५० |
| ९ | गुंठेवारी विकास नियमित करणे | ५.०० | ६.०० | | ११.०० |
| १० | जाहिरात बोर्ड जागा भाडे | ८.०० | १२.०० | | २०.०० |
| ११ | मनपा शाळा भाडेपासुन उत्पन्न | २०.०० | २५.०० | | ४५.०० |
| १२ | पे ॲण्ड पार्क | ११.०० | १०.०० | | २१.०० |
| १३ | मोबाईल टॉवर प्रशासकीय शुल्क | १०.०० | २५.०० | | ३५.०० |
| १४ | जैव वैद्यकीय कचरा विलेवाट | ४५.०० | ३०.०० | | ७५.०० |
| १५ | घनकचरा संकलन व वाहतुक अंतर्गत मनपा वाहन भाडेपासुन उत्पन्न | ३००.०० | ५०.०० | | ३५०.०० |
| १६ | अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमियम | २००.०० | १००.०० | | ३००.०० |
| १७ | विकास भार निधी | ५००.०० | ५०.०० | | ५५०.०० |
| १८ | बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा | २०.०० | १०.०० | | ३०.०० |
| १९ | रेखांकन अंतर्गत सुधाराणा (ले आऊट धारक) | १५०.०० | २५.०० | | १७५.०० |
| २० | अनधिकृत ाळ नियमानुकूल करणे | १००.०० | १००.०० | | २००.०० |
| २१ | पाणी विक्री जमा | २५.०० | ५०.०० | | ७५.०० |
| २२ | अमृत- भुयारी गटार योजना (फेज२ सर्व उपनगर) | ०.०० | ५००.०० | | ५००.०० |
| २३ | नळधारकाकडून जमा पाणीपट्टी | २२००.०० | २००.०० | | २४००.०० |
| २४ | रस्ते फोडणे, जोडणे वसुली व बांधकाम इतर | १५०.०० | १००.०० | | २५०.०० |
| २५ | मोबाईल टॉवर दंडात्मक कारवाईपासुन उत्पन्न | २१.०० | ५०.०० | | ७१.०० |
| | **एकुण** | **१२४४२.५०** | **२३७२.५०** | **०.००** | **१४८१४.५०** |

| अ.नं. | **लेखाशिर्ष (खर्च बाजू) सन २०२१-२२** | मा.आयुक्त यांनी केलेली तरतूद | मा. स्थायी समितीने केलेला बदल | | मा. स्थायी समिती सभेने मंजुर केलेली तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| १ | सावेडी गावठाण येथे शॉपिंग़ कौंम्ल्पेक्स बांधणे | ०.०० | ५००.०० | | ५००.०० |
| २ | विद्युत साहिय्त खरेदी व देखभाल | ११०.०० | ५०.०० | | १६०.०० |
| ३ | पुतळे बसविणे | ४०.०० | ४०.०० | | ८०.०० |
| ४ | कंत्राटी पध्दतीने पवारणी करणे | ३५.०० | १५.०० | | ५०.०० |
| ५ | जेंडार बजेट- महिला व बाल कल्याण कार्यक्रम | ५१.०० | ४९.०० | | १००.०० |
| ६ | मार्केट यार्ड/समर्थनगर येथे पाण्याची टाकी | १०.०० | १०.०० | | २०.०० |
| ७ | क्रीडांगणे विकासित करणे | १.०० | ५.०० | | ६.०० |
| ८ | मनपा कर्मचारी घरकूल योजना | १.०० | ५०.०० | | ५१.०० |
| ९ | महापौर शहर विकास निधी | ०.०० | २००.०० | | २००.०० |
| १० | उपमहापौर शहर विकास निधी | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |
| ११ | सभापती स्थायी समिती शहर विकास निधी | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |
| १२ | सभागृह नेता शहर विकास निधी | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |
| १३ | विरोधी पक्षनेता शहर विकास निधी | ०.०० | २५.०० | | २५.०० |
| १४ | सभापती, महिला व बाल कल्याण निधी | ०.०० | १५.०० | | १५.०० |
| १५ | उपसभापती, महिला व बाल कल्याण निधी | ०.०० | १०.०० | | १०.०० |
| १६ | नविन रस्ते विकसीत करणे | १७५.०० | ३०.०० | | २०५.०० |
| १७ | नविन ड्रेनेज | ३०.०० | ३०.०० | | ६०.०० |
| १८ | उल्लेखनिय कार्याबद्दल गौरव | १.०० | १.०० | | २.०० |
| १९ | सामाजिक संस्थांना देणगी | २.०० | २.५० | | ४.५० |
| २० | अतिरिक्त चटई क्षेत्र निर्देशांक पोटी प्रिमियम | २००.०० | १००.०० | | ३००.०० |
| २१ | विकास भार निधी | १२५.०० | १२.५० | | १३७.५० |
| २२ | विकास भार निधी (नगररचना भू-संपादन) | ३७५.०० | ३७.५० | | ४१२.५० |
| २३ | बांधकाम परवानगी अंतर्गत सुधारणा | २०.०० | १०.०० | | ३०.०० |
| २४ | रेखांकन अंतर्गत सुधाराणा (ले आऊट धारक) | १५०.०० | २५.०० | | १७५.०० |

| अ.नं. | **लेखाशिर्ष (खर्च बाजू) सन २०२१-२२** | मा.आयुक्त यांनी केलेली तरतूद | मा. स्थायी समितीने केलेला बदल | | मा. स्थायी समिती सभेने मंजुर केलेली तरतूद |
|---|---|---|---|---|---|
| | | | वाढ | घट | |
| २५ | अमृत- भुयारी गटार योजना (फेज-२ सर्व उपनगर) | ०.०० | ५००.०० | | ५००.०० |
| २६ | विकास योजना GIS Based सुधारीत करणे (अमृत, १५ वा वित्त आयोग/ विकास भार किंवा वैशिष्टपूर्ण इ.योजना) | ०.०० | ३००.०० | | ३००.०० |
| २७ | नविन वाहन खरेदी (अग्निशमन विभाग) | ८०.०० | २५.०० | | १०५.०० |
| २८ | स्मशानभूमी सुधारणा | १.०० | २०.०० | | २१.०० |
| २९ | नविन शववाहिनी/ॲम्बुलन्स खरेदी करणे | ०.०० | २५.०० | | २५.०० |
| ३० | जेटीग मशिन खरेदी | ०.०० | ५०.०० | | ५०.०० |
| ३१ | मनपा रकतपेढीसाठी औषधे व उपकरणे खरेदी | १०.०० | १०.०० | | २०.०० |
| ३२ | इमारत दुरुस्ती | ५०.०० | २५.०० | | ७५.०० |
| ३३ | सर्वांसाठी घरे (मनपा हिस्सा) | १००.०० | ५०.०० | | १५०.०० |
| | **एकुण** | **१५६७.००** | **२३७२.५०** | | **३९३९.५०** |

सही /-
सभापती, स्थायी समिती
अहमदनगर महानगरपालिका

**चर्चा :-**

**विषय क्रमांक २८ चे वाचन**

मा.सभापती स्थायी समिती यांचे वतीने अंदाजपत्रक महासभेस सादर केले व त्यानंतर सभापती स्थायी समिती मा.अविनाशजी घुले यांनी आपले मनोगत सादर केले.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** आजचा दिवस अभ्यासाला वेळ द्या.

**मा.महापौर साहेब :-** ठीक आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** १ तारखेला सकाळी ११.०० वाजता घ्या.

**मा.श्री.सचिन शिंदे :-** उद्या नका घेवू.

**मा.महापौर साहेब :-** उद्या दिनांक ३१/०३/२०२१ ला दुपारी १.०० वाजता घेवू. आपले आर्थिक वर्ष संपत आहे.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** उद्या आर्थिक वर्ष संपते. उद्याच सभा घ्यावी.

**मा.सौ.चितळे सोनाली :-** मा.खा.दिलीपजी गांधी यांना मी माझ्या वतीने व प्रभागाच्या वतीने श्रध्दांजली वाहते. सर्वांनी दोन मिनीटे श्रंध्दाजली वहावी. सभागृहात श्रंध्दांजली.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** १ तारखेलाच घ्या पुस्तक सर्वांना पोहोचले पाहिजे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** आम्हाला अधिका-यांकडून माहिती घ्यायची असेल तर कसा संपर्क होईल.

**मा.महापौर साहेब :-** दिवसभर उपलब्ध राहतील.

**मा.सौ.लताबाई शेळके :-** कै.बाळासाहेब देशपांडे दवाखान्यात फॅन वगैरेच्या व्यवस्था डॉ.बोरगेंनी सध्या कराव्यात.

**मा.महापौर साहेब :-** डॉ.बोरगे व्यवस्थीत करुन घ्या.

**डॉ.बोरगे, आरोग्य अधिकारी :-** मी सद्या केल्या आहेत. एनयुएचएम चा जो निधी आहे तो ३१ मार्चच्या आत खर्च करु.

**मा.महापौर साहेब :-** ३१ ला नाही घेतला तर आहे तसाच मंजूर करावा लागेल.

**मा.श्री.महेंद्र गंधे :-** विषय लवकर का मांडला नाही.

**मा.श्री.अविनाश घुले :-** प्रशासनाने उशीरा दिला आमच्याकडे जसा आला तसा आम्ही फास्ट सादर केला.

**मुख्यलेखाधिकारी :-** प्रशासनातर्फे प्रस्ताव डिसेंबर-२०२० मध्ये सादर केला विभागाकडून माहिती गोळा करण्यासाठी वेळ लागला मा.आयुक्त साहेब हजर झाल्यानंतर सादर केला आहे. स्थायीकडे डिसेंबर मध्ये सादर केला आहे. विभाग प्रमुखाकडून माहिती यायला पाहीजे ती आली नाही.

**मा.श्री.गणेश भोसले :-** विभाग प्रमुखांवर काय कारवाई केली.

**मा.महापौर साहेब :-** आज कर-दर वाढवायचे असेल तर करता येणार नाही.

**मा.मुख्यलेखाधिकारी :-** सर्व विभाग प्रमुखांना मा.महापौर साहेब यांचेकडून पत्र प्राप्त झाल्यानंतर कळविले होते.

**मा.श्री.गणेश भोसले :-** विभाग प्रमुखांना विचारणा करा. जो संबंधित असेल त्यांना विचारणा करावी.

**मा.महापौर साहेब :-** आजची सभा तहकुब करुन उद्या दिनांक ३१/०३/२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता होईल. पुस्तक १ तासात सर्व सदस्यांना पोहोच करावेत.

तहकुब सभा दिनांक ३१/०३/२०२१ रोजी दुपारी १.०० वाजता पुन्हा सुरु.

**मुख्यलेखाधिकारी :-** सर्व सन्माननीय सभासद दिनांक ३०/०३/२०२१ रोजी महासभेस मा.सभापती, स्थायी समिती यांनी मा.महापौर साहेब यांचेकडेस बजेट सादर केले आहे. आज त्या अर्थसंकल्पाचे वाचन करीत आहे.

पान नंबर ५५

**मा.श्री.आसीफ सुलतान :-** मला प्रत मिळाली नाही. काल ३.०० वाजेपर्यंत सगळयांना प्रत मिळून जाईल असे सांगीतले पण अद्याप प्रत मिळाली नाही. मला पुस्तक द्यायला कोणीही आले नाही. संबंधितांवर कारवाई करा. माझ्याकडी CCTV फुटेज दाखवतो.

**श्री.झिने, शिपाई :-** काल ४.३० वाजता गेलो होतो. घरात नाही म्हणुन सांगीतले.

**मा.आयुक्त साहेब :-** संबंधित कर्मचारी यांचेवर शिस्तभंगाची कारवाई करुन टाका. अगोदर नोटीस देवून खुलासा मागवून खुलाशानुसार कारवाई करु.

पान नंबर ५५ महसुली जमा - सर्व साधारण कर त्यापेकी महत्वाचे घनकचरा, वृक्षकर ३१ कोटी, रस्ता कर २.८१ लाख, दंड व इतर वसुली असे एकुण ६४.१९,५५ तसेच उत्पन्न गृहीत, इतर ७ कोटी ५ लाख बेरीज अग्नीशमन वसुल इतर एकुण १ ते ३ -- ७१.४४ लाख कराव्यतिरिक्त उत्पन्न.

पान नंबर ५७, महानगरपालिका मालमत्ता व उपयोगीता सेवा यांचेकडून मिळालेले उत्पन्न वाचन

५८.१ जमीन भाडे व दुकान भाडे, गाळे भाडे अपेक्षीत उत्पन्न ३ लाख धरले आहे. नोटीस फी पासुन ४१ कोटी उत्पन्न गृहीत धरले आहे.

अ.नं. १३ पान नंबर ५८, २ कोटी २५ लाख सामान भाडे, किरकोळ वाचत नाही.

**मा.महापौर साहेब :-** उत्पन्न कमी व खर्च जास्त अशा ठिकाणी खर्च वाचवावा लागेल तोटा थांबवून कसा जास्त फायदा होईल हे पहावे.

पान नंबर ५८ अ.नं.३

**मा.महापौर साहेब :-** इंजिनिअर लायसन फी, लायसन्स फी वाढवा.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** कमी वसुली दिसते.

**इंजिनियर श्री.बल्लाळ :-** गर्व्हनमेंट ने ठरवून दिलेले दर आहेत. त्यात बदल करता येत नाही. नविन UDCPR मध्ये जिल्ह्याच्या ठिकाणी लायसन काढणे व ते सर्व ठिकाणी चालते. त्यामुळे महानगरपालिकेत लायसन नविन घेत नाहीत.

**मा.श्री.आसीफ सुलतान :-** गुंठेवारी मध्ये शासनाने जी.आर.काढला आहे. गुंठेवारी पासुन उत्पन्न मिळू शकेल डिमांड वाढेल.

**मा.महापौर साहेब :-** वाढवू.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** मोबाईल टॉवरचे पैसे कशा पध्दतीने आकारतो.

अ.नंबर ३२ पान नंबर ५९ पहा

**इंजिनियर श्री.बल्लाळ :-** प्रशमन शुल्क ३० हजार प्रत्येक टॉवरला फी शासनाने ठरवून दिले आहेत. शुल्क एकदाच येते.

**श्री.झिने रिव्हीजन विभाग प्रमुख :-** आकारणी जागा मालक व मोबाईल कंपनी यांच्यात जो भाडे करार झाला आहे. त्याच्या १०% वजा जाता आर.व्ही. व त्या वर्षाला टॅक्स जातो. साधारण ५२ हजार रुपये टॅक्सवर आकारणी होते.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** मालक ५० हजार भाडे घेतो व महानगरपालिकेला किरकोळ भाडे दाखविले जाते. भाडे आपण ठरवा दरवर्षी आपण काय बदल केला पाहीजे.

**श्री.झिने रिव्हीजन विभाग प्रमुख :-** रेडीरेकनर नुसार दर निश्चीत करु. महानगरपालिकेची फसवणूक थांबली पाहीजे. महानगरपालिकेचे प्रत्येक टॅक्सला सारखाच रेट ठरवा. जीओला, रिलायन्सला सारखाच दर ठेवा.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** बरेचसे टॉवर दाखवले नाहीत. स्टॅण्डर्ड रेट प्रमाणे दिले पाहिजे. आपला दर निश्चीत झाला पाहीजे. प्रत्येकास भाडे ५० हजार रुपये आहे. हे ऑन रेकॉर्ड आहे कनेक्शनच्या नोंदी आहेत का.

**श्री.झिने रिव्हीजन विभाग प्रमुख :-** सुप्रिम कोर्टाने आदेश दिले आहेत. सेवा खंडीत करु नका.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** सुप्रीमने कारवाई काय करावी हे सांगीतले असेल ना.

**मा.महापौर साहेब :-** थकीत किती आहेत.

**श्री.झिने रिव्हीजन विभाग प्रमुख :-** ७ कोटी

**मा.श्री.कुमार वाकळे :-** घरपट्टीत, मोबाईल टॉवर वसुली मध्ये रॅकेट आहे.

**मा.महापौर साहेब :-** महानगरपालिकेच्या उत्पन्नात जर कोणी बाधा आणीत असेल तर त्यांच्यावर कारवाई करा.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** मी भाडेक-यांची नोंद करण्याबाबत सांगीतले पण अद्यापही केलेली नाही.

**श्री.झिने रिव्हीजन विभाग प्रमुख :-** मी संबंधित कर्मचा-याला निरोप दिला.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** कमर्शिअल पट्टी लावली पाहीजे.

**मा.श्री.अविनाश घुले :-** रिव्हीजन २००३ ला झाली.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** मोबाईल टॉवरचा रेट काय लावणार त्यांच्यावर काय कारवाई करणार, घरपट्टी व मोबाईल टॉवरच्या उत्पन्नातुन छत्रपती शिवाजी महाराजांचा पुर्णाकृती पुतळा महानगरपालिकेच्या आवारात बसविणे कामी खर्च करण्याचा विषय मागील महासभेत झाला आहे.

**मा.महापौर साहेब :-** आपण याचा पुर्ण छडा लावू. ब-याच जणांना अजून मत मांडायचे आहे.

**मा.श्री.मदन आढाव :-** बोल्हेगांव मध्ये ग्रीन झोन मध्ये ले-आउट टाकतात.

**मा.महापौर साहेब :-** मोबाईल टॉवरवर बोला. गुंठेवारीचा विषय पुन्हा घेवू.

**मा.श्री.आसीफ सुलतान :-** ज्यावेळेस टॉवरची परवानगी घेतली जाते. त्यावेळेस करारनाम्यात भाडयाचा उल्लेख असतो. कंपनीवर कारवाई करायला पाहीजे.

**मा.महापौर साहेब :-** काहींचे म्हणणे करार व कंपनी भाडे खोटे असतात असे आहे.

**मा.श्री.आसीफ सुलतान :-** ओपन प्लॉटवर टॉवर उभारले आहेत. ओपन प्लॉटवर आकारणी व टॉवरवर आकारणी केली जाते.

**श्री.झिने रिव्हीजन विभाग प्रमुख :-** एकच आकारणी करतो चेक करतो.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** टॉवरवर जमा झालेले पैसे ३१ मार्चचे काम बाकी आहे. बील ३१ मार्चच्या आत झालेच पाहीजे. असे प्रशासनाचे म्हणणे आहे अजुन कामाव्यतिरिक्त आहेत काही.

**मा.महापौर साहेब :-** टॉवरवर बोला प्रत्येकाला विषय मांडायला परवानगी दिली जाईल.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** टॉवर सर्वांना सरसकट आकारणी करावी.

**मा.श्री.सचिन शिंदे :-** कल्याण रोडवरील टॉवरला परवानगी नाही. त्यांना दंड आकारत नाही. एक टॉवर काढायला सांगीतले त्याची लाईट कट केली. एमएसईबीला पत्र देण्यांत यावे. महानगरपालिकेची परवानगी असल्याशिवाय परवानगी देवू नये.

**मा.महापौर साहेब :-** ठीक आहे. कसे करता येईल ते पहा. झीने खुलासा करावा. महानगरपालिकेचे उत्पन्न बुडते का.

**श्री.झिने रिव्हीजन विभाग प्रमुख :-** मोबाईल टॉवरची कर आकारणी मासिक भाडेनुसार दर निश्चित करतो. जे भाडे नोदवले त्यानुसार आकारणी करतो. दुय्यम निबंधक यांचेकडे नोंदणी झालेल्या ॲग्रीमेंट नुसार आकारणी करतो.

**मा.महापोर साहेब :-** कामाच्या नुसार योग्य पाहीले पाहीजे. आपण आक्षेप घेतला पाहीजे. दर तीन वर्षांनी १५ टक्के भाडेवाढ करतो त्यावर काय कारवाई करायची ते करा.

**मा.आयुक्त साहेब :-** शासनाने कॅपीटल व्हॅल्युबेस व कारपेट एरिया बेस नुसार कर आकारणी बाबत निर्देश आहेत. येथे कारपेट एरिया नुसार कर आकारणी केली जाते. कॅपीटल व्हॅल्युनुसार आकारणी करावयाची झाल्यास सर्व प्रापर्टीवर त्यानुसार करावी लागेल. धोरणात्मक बाबीवर निर्णय घ्यावा लागेल.

**मा.महापौर साहेब :-** चालू रिव्हीजन मध्ये ज्या त्रुटी आहेत. त्या साठी सर्व पक्षीय गटनेत्यांची बैठक बोलवा १५ दिवसात बैठक घेवून निर्णय घेवू.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** ३१ मार्च अगोदर जी विकास कामे आहेत. त्यांचे वर्क ऑर्डर झाली. काही काम करायचे शिल्लक आहे. अधिकारी सहकार्य करीत नाही. निधी लॅप्स होतो. प्रशासनाकडून बजेटला उशीर झाला. यावर काहीतरी उपाय योजना कराव्यात.

**मा.श्री.महेंद्र गंधे :-** मा.आयुक्तांशी चर्चा केली योग्य मार्ग काढू असे सांगीतले.

**मा.श्री.अविनाश घुले :-** ऑनलाईन पध्दतीमुळे अडचण निर्माण झाली आहे. यापुर्वी महिना-महिना मुदत दिली आहे. त्यांची वर्क ऑर्डर झाली नाही. त्याचा विचार व्हावा. नगरसेवकांना भुर्दंड बसवू नये.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** दोन इंजिनियर ऑडीट साठी ठेवलेले आहे ते महानगरपालिका निधीतील कामासाठी आहे की राज्य शासनाचे निधीसाठी आहे. खुलासा करावा.

**मुख्यलेखाधिकारी :-** थर्ड पार्टी ऑडीट खुलासा करावा.

**मा.श्री.अविनाश घुले :-** किती लाखाच्या वर पाठवावा लागतो.

**मा.सौ.शीला चव्हाण :-** कोव्हीडचा खर्च कोणत्या हेडवर केला.

**मा.महापौर साहेब :-** आता निधी कसा खर्च करायचा यावर चर्चा चालू आहे. त्यावर बोला.

**इंजिनिअर श्री.निंबाळकर :-** २०० जी.आर. आहे. ड वर्ग महानगरपालिकेसाठी ५० लक्षच्या आत आवश्यकता नाही. धोरण आपण ठरवू शकतो. ५० लाखापुढे कंम्पलसरी केलेले आहे. शासकीय निधीला कंम्पलसरी आहे. ५० लाखाच्या आत गरज नाही. पण काही रॅण्डम पध्दतीने करायचे असे निर्देश आहेत. धोरण ठरवावे लागेल.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** जे संशयीत काम आहेत. त्यांची थर्ड पार्टी ऑडीट आवश्य करा. पण जे रेग्युलर कामे आहे त्याचे करु नका त्या संस्थेशी संपर्क होत नाही.

**मा.महापौर साहेब :-** जी.आर.नुसार ज्या कामात संशय आहे असेच कामे पाठवा.

**मा.श्री.अविनाश घुले :-** अडवणूकीची भूमिका धरु नका जे संशयीत कामे असतील त्यांना आवश्य करा.

**मा.महापौर साहेब :-** आयुक्त साहेब सांगा.

**मा.आयुक्त साहेब :-** २००६ जी.आर.अन्वये ५० लाखाच्या वर च्या सर्व कामांना बंधनकारक आहे. ५० लाखाच्या आतील जी.आर. मध्ये काही रॅण्डमली करायचे म्हटले आहे. कुणाच करायचे हे सभागृहाने पॉलीसी ठरवावी गटनेते वगैरे बसून.

**मा.महापौर साहेब :-** पालिका निधीतील ५० लाखाच्या आतले कामे करु नका जे संशयीत वाटतील ते करा.

**मुख्यलेखाधिकारी :-** मागच्या वर्षीचे बजेट उशीरा झाले. बजेट उशीरा सुरु झाले. वर्क ऑर्डर उशीरा झाल्या. सर्व महानगरपालिकांचा प्रॉब्लेम आहे. ३१ मार्च पूर्वी ज्या वर्क ऑर्ड झाल्या पण काम झाले नाही. अशा सर्व कामांची यादी संबंधित विभागाने २-३ दिवसात करायची आहे. अतिरिक्त तरतुद करीत आहोत. ३१ मार्च नंतर वर्क ऑर्डर देणार त्यासाठी पुढील वर्षाची तरतुद वापरावी लागणार आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** ४० लाखाचे काम आहे. वर्क ऑर्डर झालेली नाही.

**मा.श्री.महेंद्र गंधे :-** स्टॅण्डींगला विषय झाला आहे.

**मा.महापौर साहेब :-** ३१ मार्च नंतर खर्च होतो.

**मुख्यलेखाधिकारी :-** ३१ मार्च पुर्वी वर्क ऑर्डर होणर नाही. अंदाजपत्रकात तरतुद वाढवावी लागेल. ३१ मार्च पुर्वी सुधारीत मध्ये घ्यावी लागेल.

**मा.महापौर साहेब :-** बजेट वाढवून घ्यावी लागेल. मागचे गेले.

**मा.आयुक्त साहेब :-** चालू वर्षात खर्च होणार नाही. गेल्या वर्षीचे कामासाठी त्या कामाची तरतुद वाढवावी लागेल.

**मुख्यलेखाधिकारी :-** ३१ मार्च पूर्वीच्या वर्क ऑर्डर दिल्या अशा कामाची विभागाची यादी घ्यावी. नविन जी कामे आहे. टेंडर, कोटेशन वर्क ऑर्डर देणे बाकी आहे.

**उपायुक्त श्री.पठारे :-** ३१ मार्च शेवट असतो. ३१ मार्चला वर्क ऑर्डर होणे गरजेचे असते. निविदा प्रसिध्द करतांना निधी खतविलेला असतो. निधी ऑलरेडी लॅप्स झालेला असतो. मुळात ३१ मार्च २०२१ ला वर्क ऑर्डर झाली नाही तर तो निधी संपतो. ३१ मार्च पर्यंत ज्या वर्क ऑर्डर होतील त्यासाठी Spillover ठेवावा लागतो. त्यासाठी मुख्यलेखाधिकारी तरतुद ठेवतील त्यांच्या वर्क ऑर्डर झाल्या त्यांचीच देयक अदा होतील. त्यानंतर नविन आर्थिक वर्षात नविन प्रोसिस सुरु होईल. शासकीय निधी कॅरी फॉरवर्ड करतो. इतर निधी बाबतीत नव्याने प्रोसेस करणे गरजेचे आहे. ३१ मार्च संपला टेंडर झाले तर पुन्हा नव्याने प्रशासकीय मान्यता घेणे बंधनकारक आहे. उद्या ऑडीट पॅरा आला तर.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** नागरी सुविधा विकास कार्यक्रम निधी ७० लाख खतविला. आता जी तरतुद झाली. आता प्रोसीजर कशी करणार. वर्क ऑर्डर करणे काही होत नाही पैसे कमी पडतात.

**मुख्यलेखाधिकारी :-** कोणत्या वर्षाचे आहे.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** काम जुन आहे. मागच्या वेळी हा विषय मांडला.

**मुख्यलेखाधिकारी :-**जुने काम आहे. निधी लॅप्स झाला आहे.

**मा.महापौर साहेब :-** निधी संपलेला आहे. गुंठेवारीचा विषय घ्या.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** मोबाईल टॉवर बाबत काय निर्णय झाला.

**मा.महापौर साहेब :-** गटनेते बसून १५ दिवसात निर्णय घेवू.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** शिवाजी महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळयासाठी ३५ लाख ठेवले त्याचे कसे करायचे ते करा.

**मा.महापौर साहेब :-** शिवाजी महाराजांचा पुतळा खाजगी जागेत बसवतो. परवानगीची काय गरज आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** सभागृहाची मान्यता असल्यावर कोणाला विचारायची काही गरज आहे काय. याठिकाणी कंम्पौंड आहे, दरवाजा आहे व वॉचमन आहे. डांगे साहेबांवर जबाबदारी निश्चीत करा.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** आपल्याकडे सर्व सुरक्षा व्यवस्था आहे. मग हा विषय मागे ठेवण्याचे कारण काय. डॉ.बाबासाहेब आंबेडकर, महात्मा फुले, शिवाजी महाराजांचा पुतळा यांचे पुतळयांचे बाबतीत का गाभीर्याने होत नाही.

**इंजिनियर श्री.पारखी :-** शिवाजी महाराज पुतळा संदर्भात कलेक्टर ऑफिसला पत्र दिले आहे. १३ मुद्यांची पुर्तता केली. ५ त्रुटींची पूर्तता केली पण अद्याप त्यांच्याकडून उत्तर आले नाही.

**मा.महापौर साहेब :-** कोणते अटी आहेत ते दाखवा. मा.जिल्हाधिकारी साहेब यांचे अध्यक्षतेखाली एक समिती असते. पूर्तता जर झाली असेल तर मी जिल्हाधिकारी यांचेशी चर्चा करतो.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** शिवाजी महाराज पुतळयाची ३४ पर्यंत प्रोसेस झाली आहे, संभाजी महाराज पुतळा, महात्मा फुले पुतळा संदर्भात कुठपर्यंत कारवाई झाली प्रशासनाने सांगावे. महानगरपालिकेत पुतळा बसवायचा मागणीसाठी कोणत्या परवागीची गरज नाही.

**डॉ.सागर बोरुडे :-** संभाजी महाराज पुतळा पुण्यात बनवायला टाकला तो तयार झाला आहे. त्याच्या बिलाविषयी कोणी माहिती द्यावी.

**उपायुक्त श्री.पठारे :-** संभाजी महाराजांचा पुतळा प्रोफेसर कॉलनी येथे बसवायचा टर्म ॲण्ड कंडीशन्स पेक्षा जास्त पेमेंट दिले आहे. उर्वरीत पेमेंट पुतळा उभारल्यावर द्यायचे आहे. कलेक्टर ऑफीस कडून काही कागदपत्राची प्रमाणपत्र मागणी केली ते आपण पाठविले आहेत. शिवाजी महाराज यांचे पुतळा संदर्भात पुतळयाला कलासंचालनालयाची मान्यता घ्यावी लागेल. ६ महिन्यात व्हायला पाहिजे.

**मा.श्री.अविनाश घुले :-** मुंबईला परवानगीची गरज नाही.

**उपायुक्त श्री.पठारे :-** डिझाईनला कलासंचालनालयाची मंजूरी घ्यावी लागते.

**मा.महापौर साहेब :-** शिवजयंतीच्या मुहुर्तावर पुतळा बसवायला पाहीजे होता. तुम्हाला प्रमुख केले मग तुम्ही पाठपुरावा केला नाही का. आज शिवजयंती आहे. प्रत्येक वेळी विषय घ्यावा लागतो.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** यावर एका स्वतंत्र अधिका-याची नेमणूक करावी. कुमार भाउ आहेत.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** ठराव मी मांडला पण इतिवृत्तात माझेच नाव नाही. तुम्ही जेवढे उपायुक्त आयुक्त आहे. सभागृहाने ठरवून घ्यावे की सर्व ठिकाणी जातो जिथे अडचणी येतील तिथे मी फोन लावतो.

**मा.महापौर साहेब :-** डांगे साहेब येतील उद्या पासून काम सुरु करावे.

**मा.आयुक्त साहेब :-** चालेल द्यायला, पुतळयाचे संदर्भात काम मी पाहिले आहे महाराजांचे दोन ठिकाणी पुतळा बसविणेची संधी मिळाली. प्लॅन मॉडेल मंजुर करून घ्यावे लागेल. कला संचालनालयाची मान्यता घ्यावी लागेल. ३-४ महिन्यात पुतळयासाठी सर्व प्रोसेस होईल.

**मा.महापौर साहेब :-** १५ दिवसात करुन घ्या.

**मा.श्री. प्रकाश भागानगरे :-** महापौर यांनीही खंबीरपणे पाठीशी उभे रहावे.

**मा. महापौर साहेब :-** शेळके ताईंना बोलू दया.

**मा.सौ. शेळके लताताई :-** २०२० मध्ये १ कोटी ५० हजार महिला व बाल कल्याण समितीला खतविण्यात आले आहे. कॅरीफॉरवर्ड करुन घ्यावे २०२१ बजेट ५१ लाख मंजूर झाले. ६० लाख हॉस्पीटलासाठी बजेट होते. १ कोटी बजेट करावे

**मा.महापौर साहेब :-** ठिक आहे.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** संभाजी महाराज पुतळा व माळीवाडा वेशीजवळ महात्मा ज्योतीबा फुले व सावित्रीबाई फुले यांचा पुर्णाकृती पुतळा बसिवणेसाठी मा.महासभेचा ठराव लागेल तो ठराव करावा.

**मा.महापौर साहेब :-** महासभा मान्यता देईल.

**मा.श्री. अविनाश घुले :-** सर्वांनी सुचना मांडल्या ते प्रोसेस मध्ये घ्या.

**मा.महापौर साहेब :-** मा.महासभा मान्यता देईल.

**मा.सौ.सुवर्णाताई गेनप्पा :-** कोरोना काळात थोर पुरूष दगावले. ठाणे महानगरपालिकेने ५० हजार अनुदान देण्याचा निर्णय घेतला आपल्या महानगरपालिकेने अ व ब,क , ड मार्फत अनुदान देण्याचे करावे.

**मा.महापौर साहेब :-** तरतुद वाढवून देवू

**मा.सौ.लताबाई शेळके :-** ५० लाख वाढवून दयायचे सांगितले पालिकेच्या वतीने वाढवून दयावे आम्ही त्यातुन किती दयायचे

**मा.महापौर साहेब :-** तुम्ही जेवढी मागणी कराल तेवढी जास्तीची तरतुद करू

**मा.सौ. लताबाई शेळके :-** ५० लाखात कुठलेही कामे होत नाहीत.

**मा.सौ.सुवर्णाताई गेनप्पा :-** कोरोना प्रार्दुभाव वाढत आहे टेस्टसाठी गर्दी होते. रामकरण सारडा मध्ये पुन्हा टेस्ट सेंटर चालू करावे पॉझीटीव्ह पेंशटचे रिपोर्टला ३-४ दिवस लागतात.

**मा.महापौर साहेब :-** टेस्टींग सेंटर मा.शासनाचे निर्देशानुसार वाढवून घेवू.

**मा.श्री. सचिन शिंदे :-** अहमदनगर महानगरपालिकेचे वतीने किती लोकांची लसीकरण केले आहे.

**मा.आयुक्त साहेब :-** टेस्टींग रिपोर्ट लवकर येत नाही. १ मार्च पासून जास्त वाढ होत चालली आहे. जशी रूग्ण संख्या वाढते तसे कॉन्टॅक्टर ट्रेसीग वाढेल. शासकीय रूग्णालयात १००० रुग्णांची कॅपॅसिटी आहे. काही इतर ठिकानी सॅम्पल देता येईल का ते पाहतो आहोत. नाशिक येथील दातार लॅब यांचे बरोबर चर्चा झाली आहे. आज किंवा उदया निर्णय होतो आहे. २४ तासात सॅम्पल कसे घेता येईल ते पाहतो. प्रायव्हेट लॅबमध्ये ३० हजार पगार देतात. दुसरा मुद्दा लसीकरण ७ ठिकाणी करीत आहोत. रोज १०० चे उददीष्ट देतो ६०-७० टक्के लसीकरण होते. उदयापासून ४५ वर्षाच्या सर्वाना लसीकरण बंधनकारक केले आहे. भारतीय जैन संघटनेशी संपर्क करुन मदत घेत आहोत. ३ ठिकाणी चालू करीत आहे. फुलटाईम हेल्पलाईन पहिला टप्पा ९० टक्के दुसरा टप्पा ४५ व ६० वर्षे वयोमर्यादे पर्यंत १२ हजार लोकांचे लसीकरण झाले आहे. यास चांगला प्रतिसाद मिळाला व वाढत आहे. ३१ मार्च नंतर कर्मचारी मदतनीस देणार आहे. ये-या २ महिन्यात खाटांचे उददीष्ट पुर्ण करावयाचे आहे.

**मा.श्री. आसिफ सुलतान :-** आपलेच कर्मचारी वेळेवर येत नाही.

**मा.श्री. रविंद्र बारस्कर :-** बरेच जण उत्साह दाखवत नाही भिती बसलेली आहे. वृध्द लोकांचे लसीकरण होणे गरजेचे आहे. काही संस्थाना मदतीस घेवून चळवळ उभी केली. स्वेच्छेने जर त्यांनी लक्ष घातले. त्यांनी निवेदन केले तर लोक उत्साहाने बाहेर पडतील. पालिकेतर्फे कर्मचा-यांना जबाबदारी दिली तर फायदा होईल पथनाट्याव्दारे जनजागृती करावी. त्या भागातील नगरसेवकांना सहभागी करून घ्यावे.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** मा. शासनाने नाशिकच्या दातार लॅबवर कारवाई केल्याचे समजते माहिती दया.

**मा.श्री.आसिफ सुलतान :-** संबंधीत कर्मचारी वेळेत येत नाही गर्दी होणार नाही याची दक्षता घ्यावी ४५ वर्षावरील नागरिकांना लस देतो खालच्या वयाच्या लोकांना पण दयायला पाहिजे.

**मा.आयुक्त साहेब :-** आदेश बदलून ४५ वरिल केले आहेत.

**मा.श्री. प्रकाश भागानगरे :-** मागच्या कोरोना काळात काय खर्च केला.

**मा.महापौर साहेब :-** संबंधीताना माहिती घेवून बोलवा.

**मा.श्री. कुमार वाकळे :-** कोरोना संदर्भात संपुर्ण शहर लॉकडाउन करू शकत नाही किती पेशंट आढळले तर यांची व्यवस्था कशी करतो, कोणत्या पेशंटला घरी ठेवू शकतो का ? डॉक्टर गोळया घरी जावून देतात का ?

**मा.आयुक्त साहेब :-** कोरोनाचा प्रसार रोखण्याकरीता नियोजन केले आहे. ७ युपीएससी आहे. त्यामध्ये व्यवस्था केली आहे ३ ठिकाणी BS ॲन्टीजेन व्यवस्था केली आहे. गेल्या मार्चपासून १५० ट्रेसींगची व्यवस्था झाली होती. साधारण ५०० पर्यत टेस्ट होत होत्या ट्रेसींग वाढवले तशी पॉझिटीव्ह संख्याही वाढली एकुण पेशंट मागे १५-१६ लोकांचे कॉन्टॅक्ट ट्रेसिंग केले आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** कोणाचे ट्रेसिंग होत नाही. एक भाजी विक्रेता पॉझीव्हीट होता. दोघांची टेस्ट पॉझिटीव्ह आली. फोन करून सांगितले पण कोणी आले नाही. शेजारी ताप आला का नाही हे तपासले नाही.

डॉ. बोरगेंना फोन करा. सोनवणे पेशंटच्या किती संपर्कातील ट्रेसिंग केला ते विचारा मा.आयुक्त सोा. यांचे कुटुंब त्यानंतर काम करतो त्या ठिकाणीचे त्यानंतर त्याने कोठे प्रवास केला त्याठिकाणचे लोकांची १००% ट्रेसिंग करतो आपल्या नर्स आल्या घराला स्टिकर चिकटवुन निघुन गेल्या त्यांच्या संपर्कातील लोकांचे ट्रेसिंग व्हायला पाहिजे कॉन्टॅक्ट ट्रेसिंग प्रॉपर चालू नाही.

**मा.आयुक्त साहेब :-** लॅब १ चे आहे. खाजगीचे रिपोर्ट युपीएससी वाईज डिव्हाईड करतो.

**मा. श्री. कुमार वाकळे :-** माझा भाउ पॉझीव्हिट आला नंतर २१ दिवसांनी मनपाचे लोक आले. कुणी फोन करुन सांगीतले नाही हा माझ्या घरचा अनुभव आहे.

**मा.आयुक्त साहेब :-** उशिर लागला नाही पाहिजे कॉन्टॅक्ट ट्रेसिंग करुन घेवू.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** महापौर साहेबांनी एक कमिटी नेमली. ग्रुप केला त्यासोबत आरोग्य कर्मचा-यांचा ग्रुप दिला. नगरसेवकांचे सहकार्य घेतले होते. स्टाफ भरपुर आहे. ५ मोठे कॉलेज नर्सिंगचे आहेत. त्यांना पत्र दया. आता जर तसे केले तर फायदा होईल.

**मा.आयुक्त साहेब :-** स्टाफची वृत्तपत्रात जाहिरात देत आहोत एएनएम नर्स मानधनावर घेवू. उदयाच घेवू स्टाफची गरज आहे. वॉर्ड निहाय समिती आपण करु. होम क्वारंन्टाईन गेले. ४-५ दिवसापासून कमी केले आहे. एएनएम नर्स जात असतात. त्याचेजवळील मेडीसिन देतात. जास्त असलेल्या पेशंटला हॉस्पीटलला जायला सांगतात.

**मा.श्री. कुमार वाकळे :-** जिल्हा रूग्णालयाला कॉट कमी पडतात. घरी घेवू शकतो का. परवानगी आहे का ?

**मा.आयुक्त साहेब :-** कोव्हीड केअर सेंटरला पेशंटला आणावे. डॉन बास्को, पितळे बिल्डींग, तंत्रनिकेतन येथे कोवीड सेंटर चालू केले आहे. उपचार करणे शक्य नाही. सिव्हीलची कपॅसिटी २८२ ची आहे. बुथ हॉस्पीटलची ९०ची कपॅसिटी आहे. व्हॅटीलेटरचे पेशंट सिव्हीलला पाठवतो.

**मा.सौ. सोनाली चितळे :-** लॅब टेक्नीशियन मनपाकडे किती परमनंट आहेत.

**मा.आयुक्त साहेब :-** मानधन दरमहिना १८००० पडत आहे. ७-८ लॅब टेक्नीशियन, एनयुएचएम मधुन घेतले आहेत. ४ लॅब टेक्नीशियन ट्रान्सफर केले आहे. एकुण ११ टेक्नीशियन आहेत.

**मा.सौ. सोनाली चितळे :-** त्यातले किती कार्यरत आहे.

**मा.आयुक्त साहेब :-** ४ कोरोना कडे घेतले होते. कोरोनाचे काम करताना ३ लॅब टेक्नीशियन ब्लड बँकेकडे येणार आहेत. ब्लड बँक चालू करणार आहोत. उदया संध्याकाळपर्यंत ऑर्डर होवून जातील १५ एप्रिलपर्यंत व्हेल ब्लॅड चालू करत आहे.

**मा.श्री. प्रकाश भागानगरे :-** मागच्या वर्षी कोरोनावर किती खर्च केला

**मा.उपायुक्त श्री. यशवंत डांगे :-** रू.२ कोटी ४९ लाख ४३ हजार कोरोनावर खर्च केले १४ व्या वित्त आयोगातून खर्च केले.

**मा.आयुक्त साहेब :-** काही एनयुएचएम मधून व काही एसडीआरएफ फंडातुन केला आहे.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** नटराज कोव्हीड सेंटरवर किती खर्च केला माहिती दयावी. बांधकामाचे कोणी नाहीत.

**इंजिनिअर श्री. निंबाळकर :-** ८ लाख ६० हजार दुरूस्तीचा खर्च केला.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** घरपटटी माफीचा विषय होता ती केली का ?

**रिव्हीजन विभाग प्रमुख श्री. झीने :-** पत्र आलेले आहे तरतुद नसल्याने करता आले नाही. ज्याच्या जागा घेतल्या त्यांनी माफ करायची मागणी होती.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** आता कोणता बेस चालू करणार आहे.

**मा.आयुक्त साहेब :-** आता खर्च केलेला नाही मेडीसीनचा खर्च करतो ----------

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** प्रोफेसर कॉलनी चौकात महानगरपालिकेच्या स्वतःच्या जागेत कोव्हीड सेंटर चालू झाले असते हा जो ८ ते २० लाख खर्च केला त्या ऐवजी येथे खर्च केला असता तर स्वतःचे कोव्हीड सेंटर चालू झाले असते.

**उपायुक्त (कर) :-** त्याठिकाणी एमआरआय मशिनचे प्रपोजल आहे.

**मा.आयुक्त साहेब :-** खाली ओटे आहे. आपण म्हणता तर तपासणी करु. केंद्र सरकारने प्रोजेक्शन केले आहे. १२०० पेशंटचे लागेल. उद्याच ती इमारत पाहतो. टॉयलेट-बाथरुम असतील तर थोडाफार खर्च करुन चालू करु शकतो.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** कुठल्या संस्थेकडून

**मा.आयुक्त साहेब :-** बीजीएस वा भारतीय जैन संघटना यांनी ३ सेंटरचे अॅन्टीजेन तपासणीची जबाबदारी घेतली आहे. काम करतात डोनेशन वगैरे नाही. काल पॉलिटेक्नीक होस्टेल ताब्यात मिळाले रोटरी क्लब बरोबर काल चर्चा केली लाईट वगैरे दुरुस्ती करणार आहोत. डोनेशन कुठलेही मिळालेले नाही. ज्या संस्थेने ज्या कारणासाठी डोनेशन देणार ते द्यावे रोख स्वरुपात घेणार नाही. मेडीसीन वाटप, भोजन वाटप करता येईल.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** मागच्या काळात ज्या संस्थांनी आपणास मदत केली त्यांच्या पाठीवर आपण थाप देणार आहोत का. धान्य पुरविणे, जेवण पुरविणे, अॅन्टीजेन टेस्ट केले त्यांच्या कार्याची दखल घेतली नाही तर त्यांना प्रोत्साहन कसे मिळणार आपल्यास पुन्हा त्यांच्या सहकार्याची मदत लागणार आहेच

**मा.आयुक्त साहेब :-** कालच आम्ही संस्थेशी चर्चा केली. मी माझ्या सहीने तातडीने दोन्ही संस्थेला पत्र दिले. रोटरी व बीजेएस आपण जर नावे दिली तर महापौर व आयुक्त यांचे सहीने प्रमाणपत्र देवू.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** येणारे संकट मागच्या पेक्षा गंभीर स्वरुप धारण करत आहे. यासाठी आपण आर्थिक तरतुद केली का.

**मा.आयुक्त साहेब :-** संकट समोर ठेवून एसडीआरएफ मधून ८ कोटी निधी मागणी केली असून ५ कोटी ३६ लाखाची ऑर्डर झाली आहे. ३१ मार्च पर्यंत खर्च करावा अशी अट आहे. कोव्हीड साठी १४ वा वित्त आयोगातून केला जो २ कोटी खर्च केला तेवढा निधी वित्त आयोगाकडे वर्ग करु.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** सर्वांच्या आरोग्याच्या दृष्टीने आरोग्य सुविधा कमी पडू नये अशी अपेक्षा व्यक्त करतो. लोकप्रतिनिधी म्हणून आमची मदत लागत असेल तर ते कळवा.

**मा.आयुक्त साहेब :-** वित्त आयोगाचे ज्या कामाचे पैसे आहेत ते त्या कामासाठी खर्च करु.

**मा.श्री.शाम नळकांडे :-**कल्याण रोड पाणी प्रश्न मिटत नाही. १०-१२ दिवसांनीच पाणी पुरवठा होतो. आम्ही हतबल झालो आहोत. आम्हाला कोरोनाची नाही पण पाण्याची भिती वाटते तुम्ही नुसते आश्वासन देता केंव्हा थांबणार कल्याण रोडचा प्रश्न.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** कल्याण रोड पाणी प्रश्ना संदर्भात तातडीने विषय हाती घेतला आहे. पहिली उपाययोजना वसंतटेकडीला १० एच.पी.ची मोटार टाकून जास्तीचे पाणी उचलले. फेज-२ ची टाकीच्या इरेक्ट आउटलेट वॉल टाकुन पाणी थोपवण्याचा पाणी प्रेशरने देण्यासाठी काम हाती घेतो .

फेज-२ लाईन जोड + टीका पण घेतली. चालू करणार आहे. येत्या महिन्या भरात पाणी प्रश्न निश्चीत कमी होणार आहे. श्रीकृष्ण नगरचा भाग १ आठवडयाच्या आत आणण्याचा प्रयत्न आहे. संपवेल उभारण्याचे टेंडर आज प्रसिध्द केले जाईल.

**मा.श्री.सचिन शिंदे :-** तुम्ही म्हणाले श्रीकृष्ण नगर विद्या कॉलनीतील पाणी ७ दिवसावर आले सांगीतले पण तसे नाही.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** येत्या महिन्या भरात पाणी प्रश्न ८-१० दिवसावर येईल.

**मा.श्री.सचिन शिंदे :-** आम्ही कॉन्टॅक्ट कोणाशी करायचा मी तुमच्याशी बोलतो तुम्ही दुसरीकडे बघता.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-**तुम्ही माझ्याशी चर्चा करा.

**मा.श्री.सचिन शिंदे :-** तुम्ही एका माणसाला किती पाणी देणार.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** १३ प्रति दरडोई दरमाणसी दररोज देणार. आपला प्रश्न नाकारत नाही दिवसभर काम चालू आहे.

**मा.श्री.सचिन शिंदे :-** २० वर्ष झाले.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** ८ दिवसात पाणी पुरवठा करा नाहीतर नाईलाजाने बोंबाबोंब आंदोलन करावे लागेल. तुम्ही आमच्या जागेवर येवून बघा.

**मा.श्री.सचिन शिंदे :-** जाणूनबुजून करता का किती दिवसात करणार आम्ही फक्त पिण्याचे पाणी देवू म्हणाले.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** टँकरचा विषय होता त्यांना म्हटलो पिण्यापुरते पाणी घ्या.

**मा.श्री.सचिन शिंदे :-** ३० कॅलटला एवढे पाणी पुरेल का.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** यांनी मा.आयुक्त यांना निवेदन दिले.

**मा.श्री.सचिन शिंदे :-** घरपट्टी भरायला लोक तयार नाहीत.

**उपायुक्त (कर) :-** एप्रिल अखेर पाणी प्रश्न मार्गी लावू संपवेलचे टेंडर फ्लॅश होईल.

**मा.श्री.सचिन शिंदे :-** संपवेलचे काम तातडीने करावे. ब्लॅक ऑईल आहे. १२ दिवसाला पाणी आता येते ते आता किती दिवसाला देणार.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** नगर शहराला दिवसाआड पाण्याची व्यवस्था करता कल्याण रोड दिवसाआड दोन दिवसा आड पाणी पुरवठा करावा. वृत्तपत्रात वाचावे नगर शहराला दररोज पाणी पुरवठा होईल एवढे. पाणी बील जास्त आहे. ग्राउंड लेव्हलला काम करावे लागेल.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** दोन इंची पाईप बदलून येणार आहेत. जुन्या टाकीवरुन त्यालाच घेणार आहोत. ४.५ दिवसाला पाणी आणण्याचा प्रयतन करणार आहोत.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** आमची हतबलता तुमच्या समोर आहे.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** निवेदन दिले.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** लेखानगर, ढवणवस्तीतुन फेज-३ लाईन गेली मी अनेक वेळा पत्र दिले. तिथला पाणी प्रश्न मार्गी लागत नाही. स्वतंत्र मिटींग लावावी.

**मा.सौ.लताताई शेळके :-** मी बजेटचे विचारले. १ कोटी ५ लाखाचे विचारले २०२० मध्ये तरतुद केली होती. कॅरी फॉरवर्ड करा.

**मा.महापौर साहेब :-** प्रशासनाला सांगतो.

**मा.सौ.लताताई शेळके :-** बाळासाहेब देशपांडे दवाखान्यासाठी सोनोग्राफीसाठी कर्मचारी नाही. साफसफाई साठी कर्मचारी नाही तरतुद करावी.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** नगर शहरात ग्रॅव्हेटी मेन लाईनने पाणी येते त्यावर कोणत्या २० ठिकाणी कनेक्शन दिले त्यामुळे टाक्या भरत नाही. ते कनेक्शन देता येतात का.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** मुळानगर ते विळद, विळद ते वसंत टेकडी या दरम्यान मुख्य जलवाहीनीवर एवढयात कोणतेच कनेक्शन दिलेले नाही. पुर्वीचेच आहे. नियमाप्रमाणे देता येत नाही. ०१/०७/१९९९ पुर्वीच ग्रामपंचायतींना कनेक्शन दिले. पूर्वी ३० होत्या शिंगवे देहरे विळद व विळद जवळील गावे यांना दिलेले आहे.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** नागरीक प्रश्न विचारतात.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** येणारे पाणी व्यवस्थीत आहे. वितरण व्यवस्थेवर काही त्रुटी आहेत त्या सोडवायचे काम हाती घेतले.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** अमृत योजनेचे काम मेन लाईनला जोडण्यास कीती दिवस लागतील.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** दोन - तीन महिन्यात काम पूर्ण करण्याचा मानस आहे. मुळानगर ते विळद मे च्या पहिल्या आठवडयापर्यंत टारगेट दिले आहे.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** नगर शहरात दोन महिन्यात प्रॉब्लेम झाला आहे.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** कल्याण रोडचा प्रश्न मार्गी लावत आहोत.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** मनपाच्या पिण्याच्या पाण्याच्या टाकीतुन अगोदर सर्जेपुरा येथून पाणी सोडले जाते. त्या लाईनला ढोणे साहेब वॉल सोडू देत नाही. त्यांनी त्यांच्या वेळेत माहिती द्यावी. वॉलमनला फोन केला की आमचे वॉल सोडत नाही तोपर्यंत ते सोडू देत नाही.

**उपमहापौर मालनताई ढोणे :-** वॉलमन चूकीची माहिती देतात. आम्हाला पाणी येत नाही. सर्जेपुराला ५ ते ५.३० वाजता पाणी येते. अगोदर तुमच्याकडे पाणी येते. बाळासाहेब बोराटेंना विचारा ते माहिती देतील त्या वेळेस माझे वॉलमन उभे असतात. त्यावेळेस बाळासाहेब बोराटे उपस्थित असतात.

**मा.श्री.अविनाश घुले :-** वसंत टेकडी पासुन गावाकडे जे पाणी येते त्यावरुन काही कनेक्शन दिले का. जोपर्यंत फेज-२ चे काम पूर्ण होत नाही. ठोस काहीतरी निर्णय लवकर झाला पाहीजे. सगळयांना लवकर पाणी द्या. आहे त्या पाण्यात सुधारणा करा.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** यंत्रणेतील चूका सुधारण्याचे काम चालू आहे. तातडीने उपाययोजनेच्या ठिकाणी काम चालू आहे. कल्याण रोड, सारसनगर असेल.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** मेंटेंनन्सचे काम, वॉल रिपेअरींगचे काम वेळेत होत नाही. कित्येक ठिकाणी स्वतः खर्च करुन ते पाईप आणतो पण जोडणे होत नाही. जेसीबी साठी सातपुतेंना फोन केला.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** जेसीबींचे टेंडर पुर्ण महिन्यासाठी भाडयाने घेत आहोत. टेंडर काढत आहोत.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** गांधीनगर मधल्या लोकांना २० दिवस झाले पाणी येत नाही.

**इंजिनियर श्री.सातपुते :-** बजेट तरतुद संपली उद्या येवून जाईल बील अग्रक्रमाने काढावे.

**मा.सौ.शीला चव्हाण :-** माझ्या वॉर्डात शिवदर्शन कॉलनीत ३ महिने झाले पाणी येत नाही. २-३ वॉल टाकायचे ते बसवून देत नाही. बील निघाले नाही.

**इंजिनियर श्री.सातपुते :-** पेमेंट नसल्यामुळे बसवता आले नाही.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** शिवदर्शन कॉलनीत चार इंची दोन वॉल दोन दिवसात बसवुन देतो.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** गेल्या १ ते दीड महिन्यात पाईप लाईन रोडला प्रेशर नाही. मोटार लावून सुध्दा पुरेशा दाबाने पाणी येवू शकत नाही. पूर्वी २२ आटे होते. आता १०-१२ आटे फिरवले जातात आटे फिरवायचे काम कोण करते.

**मेकॅनिकल इंजिनियर श्री.निकम :-** अस काही होत असेल तर मी पाहतो. अस नाही व्हायला पाहीजे. सातपुतेंना पाठवतो. अडचण पाहून घेतो तुम्हाला ही गोष्ट माहिती नसते.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** पाणी पुरवठा विभागाकडे अपुरा कर्मचारी वर्ग आहे. तीन कर्मचारी आहेत. मानधनावर कर्मचा-यांचे टेंडर कोणी भरत नाही. जिव्हाळयाचा प्रश्न आहे. स्थायी समितीने मागणी केली पाणी पुरवठा विभागाकडील जे बील असतील मटेरियलचे, कर्मचारी पुरविणेचे व इतर बाबतीत त्यांची बीले तातडीने अदा करावी. रोखीची तरतुद करावी जेणेकरुन नागरिकांचे पाणी प्रश्न पेंडींग राहणार नाहीत.

**मा.महापौर साहेब :-** प्रकाश भागानगरे यांनी जी मागणी केली त्यानुसार तातडीने रोख निधी ठेवण्यांत यावा.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** मा.शासनाचे विविध योजने अंतर्गत महानगरपालिकेस प्राप्त होणा-या निधीतील विकास कामे सुचविणेचा अधिकार मा.महापौर साहेब यांना देण्यांत यावेत. बजेटमध्ये विकासभार, रेखांकन अंतर्गत सुधारणा, प्रिमीयम यांचेकरीता  तरतुद वाढविण्यांत याव्यात. १०० टक्के या बजेटला लगेच मंजूरी देवून टाका. नागरिकांना सुविधा देण्यांत याव्यात. बजेट लगेच मंजूर करण्यांत यावे.

**उपायुक्त श्री.पठारे :-** नियमानुसार १०० टक्के बजेट रिलीज करता येत नाही. ५० टक्के रिलीज करतो. नोव्हेंबर नंतर आढावा घेवून १० टक्के रिलीज करतो. रिलीज होत नाही त्यामुळे काम प्रस्तावीत करता येत  नाही. जमा बाजू व खर्च बाजुचा आढावा घेवून रिलीज करतो.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** छोटया कामाची वर्क ऑर्डर झालेली नाही ठेकेदाराने अर्धवट कामे झालेली असतात. आताच संपत बारस्कर यांनी जी सूचना मांडली कामे सूचविण्याचा अधिकार मा.महापौर साहेब यांना देण्यात यावा जिल्हा नियोजन विकास योजना व मा.शासनाच्या विविध योजनेच्या निधी संदर्भात.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** मागच्या बजेटला वृक्षकर जमा होतो. वृक्ष लागवडीचा व संगोपनाचा ठराव केला आपल्या महानगरपालिकेने किती झाडे त्या पैशातुन लावली याची माहिती द्यावी.

**मा.श्री.मदन आढाव :-** राहीलेले काम आहेत मंजूरी आल्या नाही. त्यावर काय निर्णय घेणार या विषयावर चर्चा झाली.

**मा.महापौर साहेब :-** तुम्हाला सांगतो नंतर चर्चा झाली.

**मा.श्री.रामदास आंधळे :-** उपायुक्त साहेब यांना सांगीतले तर ते म्हणतात की काय काय काम बघू. मग तक्रार कोणाकडे करायची. पठारे साहेब म्हणतात.

**उद्यान विभाग प्रमुख श्री.म्हसे :-** सन २०२१ च्या बजेट तरतुदींमधून वृक्ष लागवड केली एकुण ३२३५ झाडांची मागणी वनीकरण विभागाकडे करण्यांत आली. बुरुडगांव कचरा डेपो, सावेडी कचरा डेपो व काही ओपन स्पेस मधे लावली. आपल्या क्षेत्रात लागवड झाली.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** ठेकेदाराने झाड लावून द्यायचे अशी करारनाम्यात तरतुद आहे. वृक्षकर किती जमा होतो वर्षभरात.

**उद्यान विभाग प्रमुख श्री.म्हसे :-** ५० लाख जमा होतो.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** मागच्या वर्षी ठरले होते. ५-१० फुटाचे झाड खरेदी करण्याचा निर्णय झाला.

**उद्यान विभाग प्रमुख श्री.म्हसे :-** चालू बजेट मध्ये प्रस्तावीत करीत आहोत.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** ५ मीनिटापूर्वी ओपन स्पेसमध्ये लावले असे म्हटले.

**उद्यान विभाग प्रमुख श्री.म्हसे :-** वन विभागाचे ५-६ ठिकाण आहेत. प्रोफेसर कॉलनी जॉगींग पार्क वर चिंच बाभुळ अंबा इत्यादी झाडे लावली आहेत.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** जेवढी सांगीतली त्यापेक्षा कमी झाडे असतील तर महापौर साहेब यांना सस्पेंड करणार का.

**उद्यान विभाग प्रमुख श्री.म्हसे :-** कार्यक्रम घेवून झाडे लावली.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** ठराविक मॉडेल रस्ते घेवुन बोअरवेल घेवून ठिंबकची व्यवस्था करा. ५-१० फुटाचे झाड खरेदी करायचे. पर्यावरण पुरक झाडे लावायची पर्यावरणाच्या दृष्टीने हे करायचे. पर्यावरणाचा समतोल राखायचा आहे. १०-१२ फुटाचे झाड आणले का.

**उद्यान विभाग प्रमुख श्री.म्हसे :-** अजुन कार्यवाही झालेली नाही. रस्त्यांच्या यादीचा प्रस्ताव केला आहे. चालू बजेटमधुन करता येईल.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** धोकादायक झाडे कोण कापते पावसाळयात झाड पडले एखाद्याचा जीव गेला. घर पडले, वाहनाचे नुकसान झाले याला जबाबदार कोण.

**उद्यान विभाग प्रमुख श्री.म्हसे :-** ठेकेदार नेमावा लागेल. कर्मचारी कमी आहेत. फोन केला तर कर्मचारी पाठवतो.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** पठारे साहेब, डांगे साहेबयांच्या कडे पत्र द्या. १०-१२ फुटाची झाडे घ्यावीत. लहान झाडे टिकत नाहीत.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** सावेडी व बुरुडगांवला झाडे लावली असे सांगीतले. सावेडीत बसविले का.

**उद्यान विभाग प्रमुख श्री.म्हसे :-** ८-१० फुटाचे झाडे बसविणार.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** ६८५ रुपयांना कोणते झाड भेटणार.

**उद्यान विभाग प्रमुख श्री.म्हसे :-** वड पिंपळ मिळणार. बुरुडगांव येथे ३-४ फुटाची झाडे लावली.

**उपायुक्त (कर) :-** बुरुडगांवला छोटी झाडे लावली आहेत.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** ३-४ फुटाची झाडे आहेत. ८०० रुपयांचे झाड लावल्याचे सांगतात. एवढ होवून सावेडी डेपोवर लावणार आहेत असे सांगतात. तुम्ही जे सध्या करतात ते सर्व अडचणीत येणार आहे. मागचे झाड काढून मोठे झाड लावा. सावेडी भागात १२ फुटाचे झाड पाहीजे. त्या खालचे दिले तर सभागृहात आणून तुमच्यावर कारवाई ची मागणी करु. कोरोनाचा काळ सोडून किती झाड लावली.

**उद्यान विभाग प्रमुख श्री.म्हसे :-** २७ हजार उद्दीष्ट्य होते. ७ हजार झाडे लावली.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** ७ हजार झाडे कोठे आहेत.

**उद्यान विभाग प्रमुख श्री.म्हसे :-** स्थानिक संस्था यांच्या मागणी नुसार लावले आहेत.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** १ हजार झाडे लावली ती ठिकाणे सांगा.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** तुम्ही रस्त्याच्या कडेला झाडे लावली नाहीत. तुम्ही शाळेत झाडे दिली. ४ थी च्या २ रीच्या मुलांना झाडे दिली.

**उद्यान विभाग प्रमुख श्री.म्हसे :-** शाळांना उद्दीष्टय राहायचे.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** आम्ही जे पत्र दिले. तरतुद करा. प्रस्ताव पूर्ण करा पण काही केले नाही. येत्या बजेटमध्ये झाड लावण्यासाठी तरतुद करा. येत्या महासभेत आम्ही प्रश्न उपस्थित करु. कारवाईची मागणी करु.

**मा.महापौर साहेब :-** महानगरपालिकेच्या शाळेमध्ये ५० ते १०० झाडे लावा. शिक्षकांना उद्दीष्टय द्या ते जगले पाहीजेत. शाळांना कंम्पौंड आहेत.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** आम्हाला १२ फुटापर्यंत झाड दिले पाहीजेत. झाड कुठले लावणार आहेत हे आम्हाला कळवावे. वड, पिंपळ, कदंब, मोहगाडे, रबर इत्यादी झाडे मिळाली पाहीजे. त्याकरीता आम्हाला संपर्क करा. हे झाड सावेडी कचरा डेपोवर स्मशान भूमी होणार आहे तेथे लावू. कार्यक्रम घ्या.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** एक कोणताही मॉडेल रोड व्हावा त्या ठिकाणी चांगली झाडे लावा.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** वृक्ष लागवड करण्यांत यावी. नगर मधील बदल जाणवतो. लोखंडी पुला जवळील झाड पाहिल्यानंतर समाधान वाटते. बदल झालेला दिसतो. सारसनगर भिंगार नाल्यावर वृक्ष लागवड करावी. नदी पात्राच्या आजुबाजुला जागा आहे. वृक्ष लागवड करण्यांत यावी.

**मा.महापौर साहेब :-** नविन झाडांची लागवड करतांना प्रकाशा भागानगरे यांनी सूचविलेले ठिकाण घेण्यांत यावे.

**मा.श्री.कुमार वाकळे : -** मागच्या बजेटच्या वेळेस विषय आला. बंगल्याच्या आजुबाजुला पर्यावरण पुरक झाड लावलेल्यांना करात सवलत द्यायची असा ठराव केला त्यावर यावेळेस नविन प्रथा केली बंगल्याच्या साईड मार्गामध्ये पर्यावरण पुरक झाडे लावली तर अशांना कर सवलत देण्यांत यावी.

**मा.महापौर साहेब :-** कायद्यात बसवून काय तरतुद करता येईल ते पाहू. लोकांना प्रोत्साहन मिळेल. झाडे लागतील. उपायुक्त यांनी करात सवलतीचा विचार करावा.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** झाड कमीत कमी २० फुटांचे असावे. कॅटेगरी आपण ठरवा.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** कंम्प्लीशन देतांना झाड लावण्याबाबत नमुद असते. मंजूरी देतांना एकदम छोटी छोटी झाडे असतात. ब-याचशा अपार्टमेंट समोर झाडे नाहीत तरी नगररचना कंम्प्लीशन देतात.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** स्थानीक वातावरणातील झाडे ठरवून द्या.

**मा.महापौर साहेब :-** ठीक आहे.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** पीएमवाय योजने अंतर्गत ड्रॉ काढला ब-याच जणांना कर्ज कसे काढायचे हे माहित नाही. एखादी समिती नेमली पाहीजे. पात्र लोकांनामधून ड्रॉ काढला त्यांना मार्गदर्शन केले लोन प्रकरण मंजूर केले तर एवढया मोठया योजनेचे नाव राहील.

**मा.महापौर साहेब :-** चांगला विषय आहे. प्रायव्हेट एजन्सी नेमून तरतुद करु.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** छाननी नेमला तो चांगल्या पैकी योजना अंतिम टप्प्यात जाईल.

**मा.श्री.मदन आढाव :-** ग्रीन झोनमध्ये प्लॉट टाकून विकता येतात का.

**मा.महापौर साहेब :-** घेणाराने पाहुन घ्यावे लोकांना आवाहन केले पाहीजे.

**मा.श्री.मदन आढाव :-** हे थांबवले पाहीजे. महानगरपालिकेचे अधिकारी पाठवून तेथे प्लॉट कसे टाकता येतील. याची पाहणी करुन काम थांबवायला पाहीजे. ले आउट टाकायला परवानगी असते का. ग्रीन झोनमध्ये ले आउटला मंजूरी नाही. चारठाणकर त्यांच्यावर कारवाई करा. ५ लाखाचे प्लॉट विकतात. विरोबा मंदिर बोल्हेगांव सावेडी रोड वरील जागेत प्लॉट पाडले आहेत.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** ले आउट कोणाचा आहे. पाहुन घेतो.

**मा.श्री.मदन आढाव :-** बल्लाळ साहेबांना तक्रार केलेली आहे. महानगरपालिका हद्दीत आहे. भविष्यात झोन बदलला तर रोड करता येणार नाही.

**मा.महापौर साहेब :-** बल्लाळ साहेबांकडे तक्रार केली.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** मा.आयुक्त साहेबांकडे अहवाल सादर करुन कारवाई करील.

**मा.श्री.मदन आढाव :-** रोड फोडला. संबंधीत पारखी अधिका-याला बोलावले. सिमेंट कॉक्रींट रोड फोडला. हे पाहण्याची जबाबदारी कोणाची आहे. एमआयडीसी मिलट्रीतुन लाईनसाठी बोल्हेगांवचा रोड फोडला शहनिशा केली आहे की नाही. पंचनामा केला पाहीजे.

**मा.महापौर साहेब :-** अशी लाईन टाकायची असेल रोडची मालकी आपली नाही.

**मा.श्री.मदन आढाव :-** महानगरपालिका हद्दीतला रोड फोडला

**मा.महापौर साहेब :-** निंबाळकर उद्याच्या उद्या पाहून या. जरी मालकीत नसले तरी आपल्या हद्दीतून चालला. पत्र द्या.

**मा.श्री.मदन आढाव :-** एमआयडीसी चांगले अधिकारी मॅनेज आहेत.

**मा.महापौर साहेब :-** उद्याच पाहणी करायला सांगतो.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** माझे सहकारी यांनी मागणी केली त्यास माझे अनुमोदन आहे. त्याबाबत ताबडतोब कारवाई करा.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** बजेट उशीरा मंजूर झाले. निधी पुरत नाही. आमची मागणी आहे. बजेट १०० टक्के रिलीज करण्यांत यावे. सावेडी कचरा डेपो पर्पज चेन साठी काम कुठपर्यंत आहे. त्या कामासाठी ज्या हेडमधुन ठेकेदाराची देयक अदा करता येईल त्यासाठी बजेटमध्ये तरतुद करण्यांत यावी. टी.पी.ने काय कारवाई केली.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** प्रस्ताव तयार करणे जवळ-जवळ पुर्ण झाले आहे. टीडीआर देतांना कचरा डेपो करता होतो. वापर बदली करतांना मुळ मालक परत जागा मालक जागा मागणी करु शकेल तर याबाबत अटी शर्ती तपासून आयुक्तांनी अहवाल मागीतला होता. वापरात फेर बदल ३७ खाली शासनाकडून चेंज करावा. लागेल. युनिफाईडमध्ये तरतुद बदलली आहे. पर्पज चेंज नुसार युनिफाईड मध्ये बसते का ते पाहुन ८ दिवसात आयुक्त साहेबांकडे प्रस्ताव सादर करतो.

**मा.सौ.सोनाली चितळे :-** केंद्राच्या योजना राज्य सरकारच्या योजना विविध लेखाशिषकातील योजना ठेकेदारांच्या ठेवी किती आहेत. अनामत रक्कमा किती आहेत.

**मा.महापौर साहेब :-**संबंधितांना विचारतो.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** पर्यटनाचे दृष्टीने अहमदनगर महानगरपालिकेची प्रत्येक रविवारी बस सुरु करावी हेरिटेज साठी सभागृहात ठराव करावा सकाळी ८.०० ते १२.०० पर्यंत नागरिकांसाठी चालू बंद करावी.

**मा.महापौर साहेब :-** चांगली सूचना आहे.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** ऐतिहासिक स्थळांसाठी तरतुद करावी.

**मा.महापौर साहेब :-** ठीक आहे. संबंधित अधिका-यांनी कदम मॅडम यांचे सूचनावर कारवाई करावी. चितळे मॅडमचे म्हणण्यावर माहिती घ्यावी.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** काही ठिकाणी कमर्शिअल घरपट्टी नाही. जाहीराती पासून मिळणारे उत्पन्न मिळू शकते. पालिका हद्दीतुन महामार्गावर लाईटचे पोल आहेत तिथे हॉस्पीटलची ॲड चालू आहे. त्यांनी पैसे भरले आहे का.

**जाहीरात वसुली लिपीक श्री.सुबोध देशमुख :-** पत्रकार चौकात परवानगी दिली आहे.

**मा.महापोर साहेब :-** रेट काय ठरवले किती खांबावर लावले डिटेल सांगा.

**जाहीरात वसुली लिपीक श्री.सुबोध देशमुख :-**१४० पोल आहेत. सर्जेपुरा लालटाकी वर ३००/- रुपये भाडे आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** पत्रकार चौक ते नागापूर किती पोल आहेत. १४० पोल आहेत तुम्ही मोजले का.

**जाहीरात वसुली लिपीक श्री.सुबोध देशमुख :-** इलेक्ट्रीक विभागाकडून अभिप्राय घेतो.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** कट आउटला किती साईजला परवानगी आहे. प्लॉटमध्ये लावायला परवानगी देतो का.

**जाहीरात वसुली लिपीक श्री.सुबोध देशमुख :-** ४० x २० परवानगी देतो.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** लांबीला ४० की रुंदीला ४० ४० x २० पेक्षा मोठा बोर्ड आहे का शहरात.

**जाहीरात वसुली लिपीक श्री.सुबोध देशमुख :-** साईज प्रमाणे देतो.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** २० कोणती बाजू धरणार आणि ४० कोणती बाजू धरणार

**मा.सौ.सुवर्णा गेनप्पा :-** आपण एलईडी निविदा मंजूरी दिली. त्याची कार्यवाही कुठपर्यंत आली.

**मा.महापौर साहेब :-** उद्याच कोर्टात तारीख आहे. चितळे ताईंचे उत्तर द्या.

**मा.सौ.लताताई शेळके :-** शिवाजी नगरला पाणी केडगांव उपनगरातून देवू नये. आम्हाला १० दिवसाला पाणी येते. संदीप दादा महापौर असतांना केडगांवला पाणी दिले.

**मा.महापौर साहेब :-** अर्थसंकल्प मांडतांना ब-याच सदस्यांनी उत्पन्नाचे स्त्रोत सांगीतले. यासाठी उपायुक्त दर्जाचा माणूस बसवून त्याने प्रत्येक १५ दिवसाला काय उपाय करता येईल यासाठी उपायुक्त नेमावे. सभापती, स्थायी समिती, विरोधी पक्ष नेता, सर्व नगरसेवकांनी निधी वाढविण्यासाठी मागणी केली. विकास कामासाठी निधी वाढवावा लागेल. प्रस्तावास वेळ लागला तर तात्काळ कारवाई करावी. जो वेळ लावेल त्यावर कारवाई करावी. कामाला गती मिळेल यासाठी प्रयत्न करावा. यावेळेस नगरसेवकांची टीम पाठीशी घालायला तयार नाही. प्रशासनाने गतीमान झाले पाहीजे. प्रत्येकाने अभिमान बाळगावा असे काम करावे. सर्व पक्षीय नगरसेवक आपल्या पाठीशी आहेत. काही निधींची वाढ करावी. १०० टक्के बजेट रिलीज करा. बील नंतर काढा. अडवणूकीचे धोरण धरु नये. कामाला गती द्या.

सन २०२०-२०२१ चे सुधारित व सन २०२१-२०२२ सालचे मुळ अंदाजपत्रकाबाबत मा.महासभेत झालेली चर्चा त्यामध्ये अंदाजपत्रकाच्या प्रस्तावात मा.महासभेने सुचित केलेले बदल, दुरूस्त्या व फेर फार यासह व सोबत जोडलेल्या तक्त्याप्रमाणे मान्यता देण्यांत येत आहे. ऑफिस रिपोर्ट मंजूर. खर्च मंजूर. नियमाप्रमाणे पुढील योग्य ती कार्यवाही करावी. या सभेचे इतिवृत्त कायम होण्याची प्रतिक्षा न करता कार्यवाही करावी यास ही सभा मान्यता देत आहे.

तसेच अंदाजपत्रकाच्या २०० प्रति छापून घेण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देण्यात येत आहे. खर्च मंजूर

---*---

## मा.महापौर साहेब यांचे मनोगत

अहमदनगर शहराचे ग्राम दैवत श्री विशाल गणपती व महाराष्ट्राचे कुलस्वामिनी आई तुळजाभवानी, पंढरपूरचे विठ्ठल रूख्मीणी, संत ज्ञानेश्वर महाराज, जगतगुरू संत तुकाराम महाराज व राष्ट्रसंत

आनंदऋषीजी म.सा. महाराष्ट्राचे आराध्य दैवत छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, शाहू महाराज, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे विचाराने तसेच माजी पंतप्रधान अ□लबिहारी वाजपेयी, हिंदू हृदयसम्रा□ बाळासाहेब ठाकरे यांच्या आर्शिवादाने, शहराच्या विकासासाठी व नागरिकांना मुबलक सुविधा देण्यासाठी पंतप्रधान मा.ना.श्री.नरेंद्रजी मोदी साहेब, राज्याचे मुख्यमंत्री मा.ना.श्री.उध्दवजी ठाकरे साहेब, उपमुख्यमंत्री मा.ना.श्री.अजितदादा पवार साहेब, माजी केद्रीय मंत्री मा.श्री.शरदचंद्रजी पवार साहेब, विरोधीपक्ष नेते मा.ना.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब, केंद्रीय मंत्री मा.ना.श्री.रावसाहेब दानवे साहेब, भाजपा प्रदेशाध्यक्ष मा.श्री.चंद्रकांतदादा पा□ील साहेब, विधानपरिषदेचे विरोधीपक्ष नेते मा.ना.श्री.प्रविणजी दरेकर साहेब, अहमदनगर जिल्हा पालकमंत्री मा.ना.श्री.हसनजी मुश्रीफ साहेब, मा.खा.डॉ.श्री. सुजयजी विखे पा.साहेब, माजी मंत्री मा.आ.श्री.राधाकृष्णजी विखे पा□ील साहेब, मा.आ.श्री.अरूणकाका जगताप साहेब, मा.आ.श्री.संग्रामभैय्या जगताप साहेब, माजी मंत्री मा.श्री.शिवाजीराव कर्डिले साहेब, माजी मंत्री मा.श्री.रामजी शिंदे साहेब, मनपाचे कामकाज करताना सर्व मनपा पदाधिकारी, सर्व सहकारी नगरसेवक नगरसेविका आपले मार्गदर्शन व सहकार्य तसेच सर्व अधिकारी व कर्मचारी यांचे कामकाज करताना सर्वतोपरी सहकार्य मला मिळत आहे. कोरोनाचा प्रादुर्भाव आ□ोक्यात आलेला असताना पुन्हा कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत आहे. कोरोना रूग्णांना दिलासा देण्याकरिता मनपाच्या माध्यमातून कोव्हीड सें□रची उभारणी करण्यात येत आहे. मागील आर्थिक वर्षात आर्थिक परिस्थिती बिक□ असताना देखील काही अत्यावश्यक कामे देखील करण्यात आली. महानगरपालिकेच्या माध्यमातून नागरिकांना चांगल्या नागरी सुविधा देण्याचा प्रयत्न करित आहे. मी अहमदनगर महानगरपालिकेचे सन 2021-2022 या आर्थिक वर्षाचे अंदाजपत्रक घेवून आपणा समोर येत आहे.

या आर्थिक वर्षामध्ये नागरिकांना नागरी सुविधा देताना शहर व उपनगराच्या विकासाच्या दृष□ीने व आपणा सर्वाच्या सहकार्याने तसेच शहर सुधार समिती, सर्व सामाजिक संस्था, अभियांत्रिकी महाविद्यालयातील विद्यार्थी, जागरूक नागरी मंच यांच्या सहकार्याने शहराचा विकास करण्यासाठी प्रयत्न करण्यात येणार आहे. मनपाचे उत्पन्नाचे स्त्रोत वाढविण्यासाठी, मनपाचा इतर खर्च कमी होण्याच्या दृष्टिने प्रयत्न करण्यात येणार आहे.

- शहराच्या सौदर्यात भर पडण्याच्या दृष्टिने सीनानदीच्या कडेने हरितपट्□ा विकसीत करण्यात येत आहे. सिना नदीच्या कडेने सदरचे काम पूर्ण झाल्यावर शहराच्या सौदर्यात भर पडणार आहे.
- शहरातील ओढे नाले सुशोभिकरण करण्यासाठी खाजगी व सामाजिक संस्था यांचेकडून मदत घेवून ओढे,नाले व परिसर सुशोभित करण्यात येईल त्यामुळे शहर सौदर्यात भर पडेल.
- शहर सौदर्यात भर पडण्यासाठी शहर व उपनगरातील छो□ मोठे चौक सुशोभिकरण, रस्त्याच्या मधोमध डिव्हायडर □ाकून सुशोभित करण्यासाठी खाजगी कंपनी, संस्था यांच्याकडून निधी उपलब्ध करण्याच्या दृष्टिने कार्यवाही सुरू आहे. प्रशासनाने देखील याबाबत कार्यवाही करावी.

- शहरातील कोरोना प्रादुर्भाव वाढत असल्यामुळे सर्व सामान्य रूग्णांवर उपचार होण्याकरिता मनपाच्या वतीने 3 कोवीड से□र कार्यान्वीत करण्यात आले. तसेच 2 कोवीड सें□र उभारणीचे काम सुरू आहे. परंतु नागरिकांनी स्वत:ची काळजी घेवून मा.शासनाचे नियम पाळून संसर्ग होवू यासाठी दक्षता घ्यावी. आपल्यामुळे इतरांना त्रास होणार नाही याबाबत खबरदारी घ्यावी व प्रशासनास सहकार्य करावे.
- कोरोनाचा प्रादुर्भाव वाढत असल्याने नागरिकांनी मास्क लावणे, सामाजिक अंतर ठेवणे, सनि□ायझरचा वापर करणे. नागरिकांनी प्रशासनास सहकार्य केल्यास व स्वत:ला सुरक्षित ठेवल्यास कोरोनाला हद्दपार करण्यास वेळ लागणार नाही. यासाठी मा.शासनाने दिलेल्या नियमाचे पालन करावे. व महानगरपालिका व पोलिस प्रशासनास सहकार्य करावे.
- कै.बा.देशपांडे दवाखान्यातील रक्तपेढी मनपाच्या वतीने सुरू करण्यात येणार आहे. त्यादृष्टिने प्रशासनास आदेश देण्यात आले. शहरातील गोर गरिब रूग्णांना रक्ताची गरज पाहता कमीत कमी दरामध्ये रक्त पिशवी उपलब्ध व्हावी यादृष्टिने प्रशासनाने कार्यवाही करावी..
- चितळे रोड येथील नेहरू मार्के□ इमारत व सावेडी शॉपिंग कॉम्प्लेक्स मनपाच्या किंवा मा.शासनाच्या निधीतून बांधण्यात येणार आहे. मा.शासनाकडे निधीसाठी प्रस्ताव सादर करण्यात येईल. सदर इमारतीचे बांधकाम झाल्यास शहरातील बेरोजगारांना रोजगार उपलब्ध होण्यास मदत होवून मनपाचे उत्पन्नात देखील वाढ होईल.
- सावेडी गांव येथील मनपाच्या जागेत अदयावत शॉपिंग कॉम्प्लेक्स बांधण्याचा मानस आहे. प्रशासनास सदर बाबतचा प्रस्ताव तयार करणे बाबतच्या सुचना दिलेल्या आहेत; यामुळे मनपाच्या उत्पन्न वाढण्यास मदत होईल.
- मनपाच्या जागेत इमारत बांधणे , गाळे बांधून भाडे तत्वावर देवून मनपाच्या उत्पन्नात वाढ करण्याच्या दृष्टिने प्रयत्न करणार आहे.
- शहर व उपनगरात डिजी□ल जाहिरात बोर्ड लावून तसेच जाहिरात बोर्ड चे भाडे वाढविणे, तसेच मोबाईल □ॉवरचे भाडे वाढवून त्यांना दंड आकारून मनपाचे उत्पन्न वाढविण्यात येईल.
- मनपाचे उत्पन्न वाढविण्यासाठी स्वतंत्र उपायुक्तची नेमणुक करण्यात येवून मनपाचे उत्पन्न वाढविण्यांत येईल.
- मनपाच्या पिंपळगांव माळवी येथील जागेत मनपाचे उत्पन्नाचे दृष्टिने फिल्म सि□ी सारखा प्रकल्प उभारण्याच्या दृष्टिने कार्यवाही सुरू आहे. या बाबत प्रस्ताव करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. सदर प्रकल्पामुळे मनपाच्या उत्पन्नात वाढ होईल.
- अमृत योजने अंतर्गत पाणी पुरवठा विषयक कामातील पाईप लाईन □ाकण्याच्या कामात येणा-या अडचणी बहुतांश सोडविण्यात आल्या व कामास गती देण्यात आली. मे अखेर सदर पाण्याची पाईप लाईन □ाकून पूर्ण होईल या पाईप लाईनद्वारे विळद पंपींग स्□ेशन येथे पाणी साठवणुक करून शहरामध्ये नागरिकांना पिण्याचे पाणी मुबलक व सुरळीत देण्याचा प्रयत्न आहे.

- अहमदनगर शहर पाणी पुरवठा योजना फेज-2 योजनेच्या कामाबाबत वारंवार बैठका घेवून योजनेच्या कामास गती देण्यात आली असून काही झोन मध्ये काम पूर्णत्वाच्या मार्गावर आहे अशा झोन मध्ये तातडीने पाणी पुरवठा वितरणाबाबत कार्यवाही करण्याच्या सुचना देण्यात आलेल्या असून अशा भागात नागरिकांना पाणी वितरणाचे काम करण्याबाबत लवकरच कार्यवाही करण्यात येईल.
- कल्याण रोड परिसरातील नागरिकांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्याच्या दृष्टिने त्या परिसरामध्ये संप बांधण्याकरिता निधी उपलब्ध करून देण्यता आला असून लवकरच कामास सुरूवात करण्यात येणार आहे. त्यामुळे या परिसरातील पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सुटण्यास मदत होणार आहे.
- शहरी भुयारी गटार योजनेचे काम सुरू असून ठेकेदार संस्थेस काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.
- मा.आयुक्त, मनपाचे सर्व अधिकारी, डॉ.बोरगे, आरोग्य विभागातील सर्व कर्मचारी तसेच मनपाच्या सर्व विभागातील कर्मचारी तसेच शहरातील सर्व नागरिकांच्या सहकार्यामुळे नगर शहर स्वच्छता अभियाना मध्ये बक्षिस पात्र ठरले असून मनपाने थ्री स्टार मानांकन मिळालेले आहे. मनपाचा स्वच्छता अभियानामध्ये 40 वा नंबर आल्यामुळे मनपाचे नांव देशात उंचावले आहे. नागरिकांनी असेच सहकार्य ठेवून आपले शहर स्वच्छ व सुंदर ठेवावे. मनपा मार्फत शहर स्वच्छतेसाठी सर्वोत्तपरी प्रयत्न करित आहे.
- शहरातील मोकाट कुत्र्याचा बंदोबस्त करण्याची कार्यवाही करण्यात आलेली असून मोकाट कुत्र्यांचा प्रश्न सुटण्यास मदत झाली आहे.
- अहमदनगर महानगरपालिकेमार्फत प्रधानमंत्री आवास योजने अंतर्गत केडगांव येथे 162 घरे व काटवन खंडोबा येथे 192 घरांचे बांधकामाचे काम सुरू करण्यात आले आहे. ज्यांना घरे नाहीत अशा नागरिकांनी या योजनेचा लाभ घ्यावा. मनपाकडे नोंदणी करावी
- मनपाच्या ज्या कर्मचा-यांकडे स्वत:चे सदनिका नाही अशा वर्ग 3 व 4 श्रेणीतील कर्मचा-यांसाठी सदनिका बांधणेचा मानस आहे. याकरिता जागा उपलब्धतेसाठी नगररचना विभागास सुचना देण्यात आलेल्या आहेत.
- शहरासाठी आवश्यक असणारी शहर बससेवा सुरू केली त्यामुळे सामान्य नागरिकांना त्याचा लाभ घेत आहेत.
- लोखंडी पुला शेजारी नविन पुलाचे काम अनेक वर्षापासून सुरू होते. सदर पुलाच्या कामास गती देवून पुलाचे काम पूर्ण करण्यात येवून पुल नागरिकांसाठी खुला करण्यात आला आहे.
- नाट्यगृहाचे काम बंद अवस्थेत होते नाट्यगृहास देखील निधी उपलब्ध करून कामास गती देण्यात आली आहे. नाट्यगृहाचे काम प्रगती पथावर आहे.
- बालिकाश्रम रोड जवळील पंपीग स्टेशन पासून कल्याण रोडला जोडणारा रस्ता विकसीत करण्याच्या दृष्टिने नगररचना विभागास पुढील कार्यवाही करण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

- शहरातील अनाधिकृत अतिक्रमण हटविणेसाठी संबंधीत विभागाला वाहन खरेदी, अग्निशमन विभागासाठी देखील वाहन खरेदी करण्यात येईल.
- जुने मनपा तील सभागृहाचे नुतनीकरण करण्यासाठी तरतूद करण्यात आली असून त्याबाबतची निविदा प्रक्रिया राबवून सभागृहाचे नुतनीकरण करण्यात येईल.
- शहरातील मनपाचे उदयाने खाजगी तत्वावर चालविण्यास देवून मनपाचे उत्पन्न वाढेल व लहान मुलांना, नागरिकांना उदयानात चांगल्या सुविधा मिळतील यादृष्टिने कार्यवाही करण्यात येईल.

सन 2021- 2022 चे अंदाजपत्रक मा.स्थायी समितीने तयार करून मा.महासभेपुढे सादर केले आहे. महानगरपालिका उत्पन्नाचे स्त्रोत  व शहराच्या विकासासाठी आवश्यक असणारा निधी याचा विचार करता मा.शासनाकडून मोठया स्वरूपात निधीची मागणी करण्यात आलेली असून मा.शासनाकडून निश्चितपणे निधी उपलब्ध होणार आहे. त्यामधून शहराचा विकास निश्चित होईल. यामाध्यमातून शहराचा चेहरा बदलण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे.

या सर्वाचा विचार करून या शहराचे नागरिक निश्चितपणे मनपास सहकार्य करतील अशी अपेक्षा आहे. तसेच आपल्या सर्वाचे मार्गदर्शन व सहकार्य याची अपेक्षा करित असून ते आपणा सर्वानकडून निश्चित मिळेत या अपेक्षेसह उपस्थित पदाधिकारी, नगरसेवक, नगरसेविका, अधिकारी व पत्रकार बंधू व इलेक्ट्रॉनिक मिडीया यांचे प्रतिनिधी यांनी माझे मनोगत शांतपणे ऐकून घेतले त्याबद्दल अभार.

जय हिंद   जय महाराष्ट्र

सही/-
बाबासाहेब वाकळे,
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका

**<u>ठराव</u>** -  सन 2020-2021 चे जमा व खर्च बाजूमध्ये सुधारित व सन 2021-2022 चे अंदाज पत्रकाबाबत मा.स्थायी समितीने केलेल्या सुचना, दुरूस्त्या व फेरफार व शिफारशीसह तसेच मा.महासभेमध्ये मा.सदस्यांनी केलेल्या सुचना व दिलेले पत्र तसेच दुरूस्त्या फेरफार यासह अंदाजपत्रकास ही सभा मान्यता देत आहे.

- शहरामध्ये विविध ठिकाणी विविध कंपन्याचे केबल टाकण्यासाठी खोदाई करण्यात येत आहे. रस्ता खोदाई पोटी संबंधीत कंपन्याकडून रक्कम वसुल करण्यात यावी. महावीर नगर, भिडे चौक, व इतर ठिकाणी केबल टाकण्यासाठी रस्त्याची खोदाई सुरू आहे. संबंधीत कंपनीकडून याबाबतची रक्कम वसुल करण्यात यावी. त्यामुळे मनपाच्या उत्पन्नात भर पडेल.
- मनपा हद्दीत ज्या मालमत्ताधारकांनी नविन बांधकाम किंवा जास्तीचे बाधकाम केलेले आहे. अशा मालमत्ताधारकांच्या नोंदणी करून त्यांना कर आकारणी करण्यात यावी. त्यामुळे मनपाच्या उत्पन्नात भर पडेल.

- मनपा हद्दीतील अनाधिकृत नळ कनेक्शनची शोध मोहिम राबवून अनाधिकृत नळ कनेक्शन नियमीत करणेत यावे यामुळे मनपाच्या उत्पन्नात भर पडेल.
- सावेडी गांव ते नवनाथ सायकल रासने नगर चौक जवळ निघणारा रस्ता सावेडी गांवाला जोडणारा महत्वाचा असल्याने नागरिकांच्या सोयीसाठी हा रस्ता मोकळा करणे आवश्यक असल्याने याबाबत नगररचना विभागाने तातडीने कार्यवाही करणे आवश्यक आहे.
- नगरसेवक मा.श्री.कुमार वाकळे यांनी सभागृहात केलेल्या चर्चे नुसार छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा नविन प्रशासकीय इमारत परिसरात लवकरात लवकर उभारण्याच्या दृष्टिने कार्यवाही होणे आवश्यक असल्याने याबाबत कार्यालयीन सोपास्कार तातडीने पुर्तता करून लवकरात लवकर पुतळा उभारण्याच्या दृष्टिने कार्यवाही करावी. सदर कामास प्राधान्य देण्यात यावे.
- सभागृहात झालेल्या चर्चेनुसार नगर पुणे महामार्गावर एस.टी.स्टँड चौकात रोड लगत असलेल्या पशु वैद्यकिय दवाखाना जिल्हा परिषद आवार (नगर भूमापन क्रमांक 195 प्लॉट नं. 195 क्षेत्र 7357 चौ.मी.) या जागे पैकी दक्षिणेकडील 10 गुंठे जागा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णाकृती पुतळा उभारणे कामी अहमदनगर महानगरपालिकेस जागा मिळणे कामी प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी. तसेच माळीवाडा येथे महात्मा ज्योतिबा फुले यांचा पुर्णाकृती पुतळा व छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा देखील बसविणे बाबत प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी.
- छत्रपती शिवाजी महाराज यांचा पुतळा, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा, महात्मा ज्योतिबा फुले याचा पुर्णाकृती पुतळा, छत्रपती संभाजी महाराज यांचा पुतळा बसविणे बाबत लवकरात लवकर कार्यवाही होण्याच्या दृष्टिने प्रशासनाने सर्वपक्षिय समिती गठीत करण्याबाबत कार्यवाही करावी. .
- नगरसेविका मा.सौ.दिपालीताई बारस्कर यांनी मांडलेल्या सुचनेनुसार नागरी सुविधा विकास कार्यक्रम या लेखाशिर्षामध्ये रक्कम रू. 1 कोटीची तरतूद करण्यात यावी.
- नगरसेविका मा.सौ.दिपालीताई बारस्कर यांनी दिलेल्या पत्रानुसार अहमदनगर महानगरपालिकेच्या मालकीच्या असणा-या शाळेचे दाखले व इतर रेकॉर्ड स्कॅनिंग करण्याकरिता रक्कम रूपये 20 लाखाची तरतूद करण्यात यावी.

- मागील आर्थिक वर्षात कोवीड 19 प्रादुर्भावाने शहरामध्ये लॉकडाऊन झाल्यामुळे मनपाचे अंदाजपत्रक मंजूरी उशिरा झाली त्यामुळे विकास कामे त्यानंतर सुरू करण्यात आली. मागील आर्थिक वर्षातील या प्रस्तावित करण्यात आलेल्या विकास कामांना चालू आर्थिक वर्षात लेखाशिर्ष निहाय तरतूद करणे आवश्यक आहे. रेखांकन अंतर्गत सुधारणा ( बांधकाम ) 13 लाख, विकासभार निधीतून खर्च 80 लाख , अतिरिक्त चटई निर्देशांक पोटी प्रिमीयम रकमेतून कामे करणे 2 कोटी, रेखांकन अंतर्गत सुधारणा (लेआऊट ) 1 कोटी 30 लाख , सदरील निधी या लेखाशिर्षातील प्रस्तावित विकास कामांसाठी वापरण्यात यावे. अशा कामांच्या निधीसह चालू आर्थिक वर्षात सदर लेखाशिर्षामध्ये तरतूद करण्यात यावी यास ही सभा मान्यता देत आहे. मागील आर्थिक वर्षातील विकास कामांचे प्रस्ताव प्राधान्याने घेण्यात यावे.

- विरोधीपक्ष नेते मा.श्री.संपत बारस्कर यांनी सभागृहात मांडलेल्या सुचनेनुसार चालू आर्थिक वर्षा करिता सावेडी भागात बांधकाम परवानगी अंतर्गत कामे होणे आवश्यक असल्याने रेखांकन अंतर्गत सुधारणा बांधकाम या लेखाशिर्षात रक्कम रूपये 50 लाख तरतूद करण्यात यावी, विकासभार या लेखाशिर्षात रक्कम रूपये 15 को□ी तरतूद करण्यात यावी. अतिरिक्त च□ई क्षेत्र निर्देशांक पो□ी प्रिमीयम रकमेतून कामे करणे या लेखाशिर्षात 6 को□ी तरतूद करण्यात यावी. रेखांकन अंतर्गत सुधारणा (लेआऊ□ ) या लेखाशिर्षात 3 को□ी 75 लाख तरतूद करण्यात यावी.

वरिल प्रमाणे लेखाशिर्ष निहाय मागील आर्थिक वर्ष व चालू आर्थिक वर्षासाठी तरतूद करण्यात आलेली असून रेखांकन अंतर्गत सुधारणा ( बांधकाम ) 63 लाख , विकासभार निधीतून खर्च 4 को□ी 55 लाख ,विकासभार भुसंपादनासाठी 11 को□ी 25 लाख, अतिरिक्त च□ई निर्देशांक पो□ी प्रिमीयम रकमेतून कामे करणे 8 को□ी रेखांकन अंतर्गत सुधारणा (लेआऊ□ ) 5 को□ी 5 लाख , अशी एकूण तरतूद करणे बाबत कार्यवाही करावी.

- 14 वा वित्त आयोग मुलभूत अनुदान पहिला हप्ता सन 2019-2020 करिता रक्कम रूपये 115656367 मधील प्राप्त अनुदान घनकचरा व्यवस्थापन विभागाने केलेल्या खर्चास ही सभा कार्योत्तर मंजूरी देत आहे. त्याच प्रमाणे 14 वा वित्त आयोग मुलभूत अनुदान दुसरा हप्ता सन 2017-2018 व 2018-2019 करिता रक्कम रूपये 161986778 मधील प्राप्त अनुदान घनकचरा व्यवस्थापन विभागाने केलेल्या खर्चास ही सभा कार्योत्तर मंजूरी देत आहे.त्याच प्रमाणे दोन्ही हप्त्यातील उर्वरित रकमेतून घनकचरा व्यवस्थापन विभागाने केलेल्या प्रस्तावित कामांना देखील ही सभा मान्यता देत आहे. तसेच 14 वा वित्त आयोग मुलभूत अनुदान सन 2015-2016 पासून प्राप्त अनुदानातून आज तागायत शिल्लक राहिलेले अनुदान व खर्च न केलेले अनुदानानुसार घनकचरा विभागा मार्फत प्रस्तावित करण्यात आलेल्या अनुक्रमे 1 ते 12 मुद्दयातील कामांकरिता 14 वित्त आयोग प्राप्त रकमेतून खर्च करणेकामी ही सभा मान्यता देत आहे. खर्च मंजूर प्रशासनाने याबाबत योग्य ती कार्यवाही करावी.
- मा.विरोधीपक्ष नेता शहर विकास निधी 50 लाख तरतूद करण्यात यावी.
- मा.स्थायी समितीने अंदाजपत्रकामध्ये विकास कामे लेखाशिर्षनिहाय प्रस्तावित केलेली आहेत. सदरची सर्व कामे रद्द करण्यात येत आहे. त्याप्रमाणे संबंधीत विभागाने नोंद घ्यावी.
- महालक्ष्मी उदयान, सिध्दीबाग, गंगा उदयान खाजगी करणाच्या माध्यमातून विकसीत करणे कामी योग्य ती कार्यवाही करावी. शहरातील प्रमुख चौक सुशोभिकरण करण्याच्या दृष्टिने खाजगी संस्था, कंपनी, सामाजिक संस्था, यांचे मार्फत कार्यवाही करण्यात यावी. तसेच शहरातील प्रमुख रस्त्यावरील डिव्हायडर सुशोभिकरण करणे देखील आवश्यक असून त्यामुळे परिसर देखील सुशोभित होईल याकरिता डिव्हायडर सुशोभिकरण खाजगी संस्था, कंपनी, सामाजिक संस्था यांचे मार्फत करण्याबाबत परवानगी देण्यात यावी. याकामासाठी त्यांना कमीत कमी पाच वर्षापर्यंतचा कालावधी देण्याबाबत कार्यवाही करावी यास ही सभा मान्यता देत आहे.

- मा.श्री.रविंद्र बारस्कर, नगरसेवक यांनी सभागृहात मांडलेल्या सुचनेनुसार गोरगरिब नागरिकांना घरे मिळणे करिता प्रधानमंत्री आवास योजने प्रकल्पाची जाहिरात करणे व नागरिकांची कर्ज मंजूरी करून देणे याकरिता खाजगी सल्लागाराची नेमणुक करण्यास व खर्चास ही सभा मान्यता देत आहे.
- इलेक्ट्रीक विभागा करिता असलेली आकस्मिक खर्च या लेखाशिर्षात दोन लाखानी वाढ करण्यात यावी.
- IHSDP / RAY / HUDCO, UIDSSMT योजना प्रकल्प अहवाल मनपा हिस्सा या लेखाशिर्षात 5 लाखानी तरतूद वाढविण्यात यावी.
- नगरसेविका मा.सौ.सोनालीताई चितळे यांनी दिलेल्या पत्रानुसार अंत्यसंस्कार सहाय्यक मंडळ अहमदनगर यांना अमरधाम मधील आतील भागात लाई□ ,सुशोभित झाडे, स्वच्छता, आदी कामे करून अमरधाम अंतर्गत भागात सुशोभिकरण करणे कामी मागणी केल्यानुसार देण्यास ही सभा मान्यता देत आहे. सदर संस्थेकडून सुशोभिकरण करणेसाठी देणे बाबत अ□ी व शर्ती तसेच अमरधाम मध्ये दैनंदिन स्वच्छता ठेवणे अशा बाबी बंधनकारक करून देणे बाबत योग्य ती कार्यवाही करावी.
- सावेडी परिसरासाठी स्मशानभुमी उभारणे ही गेल्या अनेक वर्षापासून नागरिकांची मागणी आहे. या दृष्टिने नगररचना व मा.आयुक्त यांनी याबाबत लक्ष घालून याबाबत योग्य ती कार्यवाही करणेसाठी □ीडीआर अथवा भूसंपादनाच्या माध्यमातील कार्यवाही प्रशासनाने लवकरात लवकर करून व जागा ताब्यात घेवून स्मशानभूमी उभारण्याच्या दृष्टिने कार्यवाही करावी. सदर कामास प्राधान्य देण्यात यावे.
- रसिक ग्रुप अहमदनगर व नगर जल्लोष ट्रस□, अहमदनगर, अंत्यसंस्कार सहाय्यक मंडळ, अमरधाम यांना सांस्कृतिक कार्यक्रमासाठी मागणी केल्यानुसार प्रत्येकी रक्कम रू. दीड लाख अर्थ सहाय्य देण्यास ही सभा मान्यता देत आहे. तसेच मागणी केलेल्या संस्थाचे धर्मदाय आयुक्त यांचेकडील नोंदणीकृत असले बाबत कागदपत्र, ताळेबंद व चा□ड अकौं□ यांचेकडील हिशोब तपासणी आदी आवश्यक कागदपत्रांची खातरजमा करूनच संस्थाना अर्थ सहाय्य देणे बाबत कार्यवाही करणेत यावी. सदरचा खर्च सामाजिक संस्थांना देणगी या लेखाशिर्षा अंतर्गत करण्यात यावी.
- साप्ताहिक नगरवेध दै.महाराष्ट्र □ाईम्स , दै.समाचार, साप्ताहिक लोकअंकुर, दै.लोकमंथन, साप्ताहिक नगर □ाईम्स, दै.सार्वमत, साप्ताहिक पोलिस पेपर, दै.महाराष्ट्र निरोप्या, साप्ताहिक ज्ञानधारा, दै.नवा मराठा, दै.पुढारी, साप्ताहिक सि□ी वॉच या वृत्तपत्रातून प्रसिध्द केलेल्या जाहिरातीच्या सन 2019 या कालावधीतील एकूण 78 देयके अदा करणेस ही सभा मान्यता देत आहे.

- सभागृहात झालेल्या चर्चे नुसार मा.शासनाकडून विविध विकास कामांसाठी विविध योजने अंतर्गत मनपास निधी मंजूर करण्यात येतो. सन 2020-2021 व 2021-2022 साठी प्राप्त होणा-या मुलभूत / प्राथमिक सोयी सुविधा विकास निधी, रस्ता अनुदान, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान (जिल्हास्तर), नागरी दलित वस्ती सुधार योजना, अल्पसंख्याक बहुलक्षेत्र विकास निधी, नागरी दलितेतर विकास निधी, नाविन्यपूर्ण योजने अंतर्गत निधी, 15वा वित्त आयोग तसेच मनपा निधी व इतरही मा.शासनाच्या निधीतील कामे सुचित करण्याचा अधिकार मा.महापौर यांना देण्यात येत आहे यास ही सभा मान्यता देत आहे.
- अपंग पुर्नवसन योजने अंतर्गत अपंगाना मानधन देण्यात येते. अपंग पुर्नवसन योजना या लेखाशिर्षात रक्कम रू. 1 को□ीची तरतुद वाढ करण्यात यावी.
- प्राथमिक सोयी सुविधा अनुदान या लेखाशिर्षामध्ये 4 लाखाची वाढ करण्यात यावी
- शासकीय योजनांमधील अतिरिक्त (अधिक्य ) खर्च या लेखाशिर्षात 30 लाखाने वाढ करण्यात यावी.
- कै.बा.देशपांडे दवाखाना येथील रक्तपेढी चालू करण्यात आली असून रक्तपेढी करिता आवश्यक असणारा कर्मचारी वर्ग यांची मानधनावर नियुक्ती करावयाची आहे. त्यांचे मानधना करिता मानधन (वैद्यकिय अधिकारी, नर्स , लॅब □क्निशियन मानधन, डॉक□र इतर ) या लेखाशिर्षात 38 लाखानी वाढ करण्यात यावी.
- थकीत देयके अदा करणे या लेखाशिर्षात 4 को□ी **53** लाखानी तरतूद कमी करण्यात यावी.
- रस्ते खोदाई फी मधून रस्ते करणे / दुरूस्ती या लेखाशिर्षामध्ये 1 को□ी 14 लाखाने तरतूद वाढविण्यात यावी.
- वार्ड विकास निधी लेखाशिर्षामध्ये रक्कम रूपये 50 लाखाची तरतूद करण्यात यावी.
- महासभेत मा.सदस्यांनी केलेल्या चर्चेनुसार अंदाजपत्रकातील विकास कामांसाठी असलेल्या लेखाशिर्षातील निधी 100 □क्के वापरण्याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी.
- 15 वा वित्त आयोगाच्या महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या निधीतून शिवाजी नगर कल्याण रोड येथे पाण्याच्या □ाकीजवळ नविन संपवेल बांधणेसाठी रक्कम रूपये 25 लाख च्या प्रस्तावास ही सभा मान्यता देत आहे.
- 15 वा वित्त आयोगाच्या महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या निधीतून अहमदनगर शहर भुयारी ग□र योजने अंतर्गत समाविष□ फरियाबाग येथे बांधण्यात येत असलेल्या 57 दशलक्ष लि□र क्षमतेच्या STP साठी संरक्षक भिंत बांधणेसाठी रक्कम रूपये 85 लाखाच्या प्रस्तावास ही सभा मान्यता देत आहे.
- 15 वा वित्त आयोगाच्या महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या निधीतून मा.केंद्र शासित अमृत योजने अंतर्गत शहर भुयारी ग□र योजने अंतर्गत मलशुध्दीकरण केंद्राकडे जाणारा रस्ता करण्यासाठी रक्कम रूपये 3 को□ी च्या प्रस्तावास ही सभा मान्यता देत आहे.

- नगरसेविका मा.सौ.आशाताई कराळे यांनी दिलेल्या पत्रानुसार महानगरपालिका क्षेत्रात मुलभूत सोयी सुविधांच्या विकासासाठी विशेष तरतूद लेखाशिर्ष  या योजनेत प्र.क्र. 5 मधील विविध ठिकाणी असलेल्या स्ट्री□ लाई□ दुरूस्ती करण्याकरिता विद्युत साहित्य बसविणेचे काम दुरूस्ती तथा परिरक्षणाचे असल्याने दि. 12 डिसेंबर 2017 चे मा.शासन निर्णयानुसार घेता येणार नसल्याने ते रद्द करण्यात येत आहे. सदर कामा ऐवजी मंजूर रक्कम रूपये 50 लक्ष मधील खाली नमुद विकास कामे घेण्यात येवून प्रशासकीय मान्यतेसाठी मा.शासनाकडे प्रस्ताव सादर करण्यात यावेत.

1) ऋनानुबंध अपा□में□ ते मुथ्था बंगला आणि आनंद नंदा मिरा अपा□में□ ते विजयनाथ बंगला पर्यत रस्ता मजबुतीकरण व डांबरीकरण करणे (रू.852710)

2) प्रेमदान हडको अंतर्गत भागात रस्ते कॉक्री□करण व पिचिंग  करणे (रू.194918)

3) मक्सकेअर हॉस्पी□ल ते निकम घरापर्यत रस्ता व  300 एमएम आरसीसी पाईप ग□र करणे (रू.154041)

4) प्रेमदान हडको, तुरे घर ते फुलकर घर व भंडारी ते मेहर घरापर्यत 300 एमएम आरसीसी पाईप ग□र करणे (रू.60999)

5) सिव्हील हडको मधील रविंद्र बक्षी ते निशाबक्षी ते कु□या मंदिर पर्यत रस्ता कॉक्री□करण करणे (रू.344780)

6) सिव्हील हडको जवळ मस्जीद जवळ शेख ते शहाणे घरा जवळ 300 एमएम आरसीसी पाईप ग□र करणे (रू.112974)

7) आदर्श सोसाय□ ,साधना हौसिंग सोसाय□ अंतर्गत रस्ते मजबुतीकरण व डांबरीकरण करणे (रू.2156177)

8) म्यु.पल वसाहत ते किंगर घर ते भा□या ते वाघ घर ते दिवान घरापर्यत 300 एमएम आरसीसी पाईप ग□र करणे व ओपन स्पेस कॉक्री□करण करणे व परिसरात पिचिंग करणे (रू.1120849)

वरिल कामांचा प्रस्ताव मा.शासनाकडे सादर करणे बाबत प्रशासनाने कार्यवाही करावी तसेच प्र.क्र. 5 मध्ये वैदुवाडी, सहकार नगर, रेणाविकर कॉलनी व प्रेमदान हडको या ठिकाणी बंदिस्त व्यायाम शाळेमध्ये व्यायाम साहित्य रक्कम रूपये 9300000 चे बसविणे करिता सदर निधी जिल्हा क्रीडा विभागाकडे वर्ग करून त्यांच्या मार्फत खरेदी करून घ्यावेत यास ही सभा मान्यता देत आहे.

15 वा वित्त आयोगाच्या महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या निधीतून सरोज पाणी □की ते इंडस्ट्रीयल इस्□□ पाण्याची □की यांना जोडणारी जलवाहीनी झेंडीगे□ बाबा बंगाली ते रेव्हेन्यू कम्पीन-सैनिक लॉन कोपरा दरम्यान 1200 एमएम व्यासाची पाईपलाईन मुख्यरस्त्याच्या बाजूने एमएस 700 एमएमची □कणेस ही सभा मान्यता देत आहे

माजी सभापती मनोज कोतकर यांच्या पत्रानुसार 15 वा वित्त आयोगाच्या महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या निधीतून प्रभाग क्रमांक 4 मध्ये कांबळे मळा- सुभद्रा नगर, लोंढेमळा या ठिकाणी नविन उंच टाकी उभारणेस ही सभा मान्यता देत आहे

15 वा वित्त आयोगाच्या महानगरपालिकेस प्राप्त झालेल्या निधीतून समदनगर पाण्याची टाकी येथे तात्पुरत्या स्वरुपात बोस्टींग पंप उभारणे बाबतच्या प्रस्तावास ही सभा मान्यता देत आहे.

अहमदनगर महानगरपालिकेस कोव्हीड-19 अनुदान प्राप्त झाले असल्याने इतर अनुदान या लेखाशिर्षात जमा बाजुत 5 कोटी 50 लाख तरतुद वाढविण्यांत यावी. तसेच कोव्हीड-19 अनुदानातुन खर्च या लेखाशिर्षात खर्च बाजुत 5 कोटी 50 लाखांची तरतुद करण्यांत यावी.

सन 2020-2021 चे सुधारित व सन 2021-2022 सालचे मुळ अंदाजपत्रक मा.स्थायी समितीने केलेल्या शिफारशी त्याबाबत मा.महासभेत झालेली चर्चा त्यामध्ये अंदाजपत्रकाच्या प्रस्तावात मा.महासभेने सुचित केलेले बदल, दुरूस्त्या व फेर फार यासह ऑफिस रिपोर्ट मंजूर. खर्च मंजूर. नियमाप्रमाणे पुढील योग्य ती कार्यवाही करावी. या सभेचे इतिवृत्त कायम होण्याची प्रतिक्षा न करता कार्यवाही करावी यास ही सभा मान्यता देत आहे.

तसेच अंदाजपत्रकाच्या 200 प्रती छापून घेण्यास व त्याकामी येणा-या खर्चास ही सभा मान्यता देण्यात येत आहे. खर्च मंजूर.

नियमानुसार कार्यवाही करावी.

सुचक :- मा.श्री.रविंद्र रावसाहेब बारस्कर

अनुमोदक :- मा.सौ.सोनाली अजय चितळे

ठराव सर्वानुमताने मंजूर

**सही /-**
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका